
अंक ४ था]

[ वर्ष २६ वें

# " श्री साईलीला "

त्रैमासिक



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

आक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर १९४९

# श्री साई लीला

### श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदकपार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २६ ] त्रैमासिक—ऑक्टो. नोव्हें. डिसें. १९४९ [ अंक ४ था

## —: संपादकीय :—

संतांच्या हृदयांत जीवाशिवाचें संगीत अखंड सुरूच असतें. त्यांची अंतरींची शांति केव्हांही कधींही ढळत नाहीं.

सागरांत वरवर अनंत लाटा उसळतात परंतु अंतरांत —खालीं, अगदीं खोल— सागर शांतच असतो.

आत्म्याची स्वयंभू महान् शक्ति नित्य असते परंतु संसारांत ही दिव्य शक्ति भ्रामक कल्पनांनीं आपण मारीत असतों. अमुक पक्षी ओरडला, मांजर आडवें गेलें कीं अपशकून झाले, एखादी सुवासिनी पाण्याची भरलेली घागर घेऊन सामोरी आली कीं आपण शुभ समजतों व रिकामा असला तर अपशकून समजतों. रिकाम्या व भरलेल्या मडक्यावर का आपलें सामर्थ्य, शक्ति व तेज अवलंबून आहे ! नाहीं, तें स्वयंभू आहे. स्वतःचेंच मडकें ( डोक्यांतील विचार ) रिकामें आहे. श्री सद्गुरु साईनाथांचे आलेले अनुभव छापले तर म्हणे श्रीसाईबाबा रागावतात. काय ही वेडी कल्पना ! आपण जर आपले अनुभव लोकांना—भक्तांना सांगितले नाहीं तर त्यांची महती कमी होईल कीं जास्त ?

संत तुकाराम, ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई वगैरेंचीं चरित्रें जर आज उपलब्ध नसतीं तर त्यांच्याविषयींची माहिती आज आपणांस कशी मिळाली असती ! आज त्यांनीं आपले अनुभव, ' पुस्तकें, अभंग, ग्रंथ ' रुपानें प्रसिद्ध करून ठेवले आहेत म्हणून या जगांत त्यांच्या पावलावर पाऊल टाकणें सोपें जात आहे.

' भावेंवीण देह, नकळे ' भाव म्हणजे देवाचें अखंड अस्तित्व. देव आपल्याजवळ आणि देवाजवळ आपण. ' देव माझा, मी देवाचा ऐसी सत्य सत्य वाचा, निश्चित प्रत्यक्षता ' म्हणजेच भाव. देव प्राप्त होण्याला–वश होण्याला–आपलासा होण्याला फक्त भाव देवास द्यावयाचा. प्रेम–त्याचेंच तें प्रेम–त्याचाच तो भाव–त्याचा त्याला परत द्यावयाचा. एवढेंच आपलें खरें कर्तव्य आहे. या एका गोष्टीशिवाय क्रिया, मार्ग, उपाय जे जे योजले जातील ते सर्व फोल ठरतील. भाव, निष्ठा, विश्वास, प्रेम–ही एकच किल्ली अंतःकरणाचें कपाट खोलून त्यांत अधिष्ठान पावलेली ती साईची दिव्य मूर्ति दाखवून देईल.

तुकारामः—

भाव तेथें देव, भाव तेथें नांव ।
भाव तेथें सर्व, साह्य होती ।
भाव तेथें शक्ति, वश हा श्रीपती ।
भावापाशीं येती कर्म धर्म ।
तुका म्हणे साध्य भाव जरी झाला ।
उणें काय त्याला सांग मज ॥

एवढें संतांचें वचन असतांना आम्हांला आलेला अनुभव ( भावा पोटीं ) आम्हीं प्रसिद्धीकरतां पाठवूं नये, किती लाजिरवाणी गोष्ट आहे ! कां तर बाबा आम्हांला रागें भरतील. श्रीसाईबाबाविषयींचे अनुभव प्रसिद्धीस न पाठविणें व आपल्या अज्ञ भोळ्या भक्तबांधवांना त्याचा स्वाद न घेऊं देणें म्हणजे स्वार्थीपणाची कमाल झाली. खरे भक्त अशी स्वार्थी दृष्टी ठेवणार नाहींत. खरा भक्त अगोदर दुसऱ्यास जेवूं घालील आणि मग आपण जेवेल.

जर श्रीसद्गुरु साईबाबांची कृपा पाहिजे असेल तर ' भाव ' त्याला समर्पण करा. ' देव सर्वत्र आहे मी कोणी नव्हे ' असें ज्या क्षणीं होतें त्या क्षणींच आपण त्याच्या भुजांत अलिंगिलें जातों. " मीपणा नसणें " जेथें " मीच " नाहीं तेथें जग असलें काय आणि नसलें काय सारखेंच.

बाबा रागें भरतील पण केव्हां ! स्वतःला पुढें येण्याकरितां, कांहीं तरी आश्चर्यकारक लिहून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकून श्रीबाबा मला भेटले असा खोटा अनुभव लिहिला तर, पण ज्याला श्री बाबांचा अनुभव आला आहे, ज्याला ' बाबा ' कोण हें समजलें आहे त्याला भिण्याचें काय कारण !

उत्पन्न होणें आवश्यक आहे. मी श्रेष्ठ, मीच मोठा व शहाणा असेन तर, मीच अशा तऱ्हेच्या अहंपणाच्या वायफळ कल्पनेला जागा न देतां, सर्वांची एकच किंमत, सर्वांचा एकच दर्जा व सर्वांचा एकच मान अशा तऱ्हेचा आदर उत्पन्न करणें व सर्व मतभेद बाजूला सारणें योग्य आहे.

याबद्दल उपनिषदांत एक सुंदर गोष्ट आहे.—

एकदां इंद्र, वायु व अग्नि या देवांत फार वाद माजला, प्रत्येकजण म्हणे 'मी श्रेष्ठ.' इंद्र म्हणाला, 'मी पाऊस पाडतों. पाऊस न पडेल तर पृथ्वी सुकेल. जीवन अशक्य होईल.' वायु म्हणाला, 'एक वेळ पाणी नसलें तरी चालेल पण हवा तर आधीं हवी, तेव्हां मीच श्रेष्ठ आहे.' अग्नि म्हणाला 'उष्णता हवी. उष्णता नसेल, तर मनुष्य थंडगार होईल, पाय गार पडतील. उष्णतेशिवाय सर्व मिथ्या आहे.'

असे वाद चालले असतांना तेथें एकदम एक तेजस्वी देवता आली. ही देवता कोण? कोठली? वगैरे देवांना गूढ पडलें. अग्नि त्या देवतेजवळ जाऊन म्हणाला, 'आपण कोण?'

त्या देवतेनेंच उलट प्रश्न केला 'आपण कोण?'

अग्नि चिडून म्हणाला 'माझें नांव माहीत नाहीं आपणांस? मी अग्नि!'

देवता म्हणाली, 'आपण काय करीत असतां?'

अग्नि संतापानें म्हणाला, 'अहो, सारें ब्रह्मांड एका क्षणांत मी जाळून टाकीन. माझा पराक्रम का तुम्हांला माहीत नाहीं?'

देवता म्हाणाली 'असेल तुमचा तसा पराक्रम परंतु ही एथें एक काडी आहे ती जाळून दाखवा बरें.'

अग्नीनें आपल्या साऱ्या ज्वाळा प्रज्वलित केल्या परंतु ती काडी त्याच्यानें जाळवेना. अग्नि खट्टु झाला व मान खालीं घालून निघून गेला. नंतर वारा आला.

'आपण कोण?' देवतेस वायु म्हणाला.

'आपण कोण?' देवतेनें उलट विचारलें.

'अहो. मी वारा.' वायु ताठ्यानें म्हणाला.

'म्हणजे काय करतां आपण?' देवतेनें प्रश्न केला.

'अहो मी पर्वतांचे चेंडू करतों, वृक्ष आपटतों, पाण्याला नाचवितों, प्रचंड लाटा निर्माण करून गलबतें बुडवितों. माझा पराक्रम आपणांस माहीत नाहीं?' वायूनें रागारागानें विचारलें.

'नाहीं. ही येथें एक काडी आहे ती उडवून दाखवा बरें!' देवतेनें सांगितलें.

वाऱ्यानें सारी शक्ति एकवटली. परंतु ती क्षुद्र काडी त्याला जागची हालवितां आली नाहीं. वारा लज्जेनें खालीं मान घालून निघून गेला. अशा रीतीनें ते सारे भांडखोर अहंमन्य देव फजित झाले.

बंधु भगिनींनो, आपण सर्वांनीं त्या साईलीलेवर अखंड प्रेम ठेवा व ते आपले अनुभव पाठवून व्यक्त करा एवढी या संपादकाची आपणांस विनंति.

संपादक :-

---

# श्री बाबांची शिकवण

तरीच जन्मा यावें । दास विठ्ठलाचे व्हावें ॥

ह्याप्रमाणें चोख कर्तव्य बजावण्यास संतांचा सहवास पाहिजे. संतांच्या वाचेंत प्रेमामृताचा पान्हा आहे, व त्यांच्या ग्रंथांत मधुरतेबरोबर रसरशीत जिवंतपणा आहे. आज कलियुगांत असत्याचें राज्य आहे. त्या काळाला आपल्या कबजांत अगर त्याचा पराभव करण्यास संतांनी आपणांस एकच महत्त्वाचें वज्र दिलें आहे; आणि तें म्हणजे "नाम."

ज्ञानेश्वरी महाराजांनी "ज्ञानेश्वरी–भावार्थ दीपिका" पूर्ण केल्यावर, आपल्या गुरूच्या ( श्रीनिवृत्तिनाथ ) आज्ञेवरून स्वानुभव लिहिला, तो— "अमृतानुभव" होय.

ज्ञानोबारायांचे हे दोन्ही ग्रंथ समजणें कठीण आहेत, आणि त्यांत ग्रथित केलेलें तत्त्व सामान्य बुद्धीच्या आवाक्याबाहेर आहे. सर्वसाधारण सर्वांच्या उपयोगी पडेल, व सर्वांस लाभ होईल, असा "हरिपाठ" त्यांनीं लिहिला.

ज्यास ज्ञानाची भूक लागली असेल, ती "ज्ञानेश्वरी" शांत करील. ज्यास अनुभवाची गोडी लागली असेल तो "अमृतानुभव"कडे जाईल. पण ज्ञान व अनुभव ज्या प्रेमांतून उगम पावले तें श्रीहरीबद्दलचें प्रेम हरिपाठांत आहे.

जाणीव व नेणीव यांचें ऐक्यस्थान जें प्रेम तें मिळण्यास स्मरणाचें विस्मरण व विस्मरणामध्यें स्मरण राहिलें पाहिजे. व ही अवस्था प्राप्त होण्यास भाव–आवडी–विश्वास पाहिजे. आणि ह्याकरितां संत सहवास नित्य असणें योग्य आहे. ( संत वाङ्मय ).

संत हे महासागर आहेत व त्यांच्या प्रेमप्रवाहांत स्नान घडलें तरच आपण पतीत, पावन होऊं. त्यांच्या नांवांत सुद्धां परम तत्त्व भरलेलें आहे.

शिरडी येथील "श्री सद्गुरु साईबाब " हे अलिकडील संत–सिद्ध पुरुष होत. त्यांनी आपल्या भक्तगणांना पुष्कळ तत्त्वें थट्टा विनोद करीत करीत सांगितलेलीं आहेत.

तत्त्वतः ते परब्रह्म असल्यामुळें नामरूपातीत आहेत. परंतु भक्तांच्या कल्याणाकरितां त्यांनीं स्थूल देह धारण करून नामाभिधान करवून घेतलें.

श्री खंडोबाचा भक्त म्हाळसापती त्यानें खंडोबाला साक्षी ठेवून "आंवोसाई" म्हणून पहिल्याच भेटींत संबोधिलें. तेंच "साई" हें नांव पुढें रूढ झालें.

श्री साई नांवारूपाला येण्यापूर्वी शिरडींत नामरूपरहित होते. त्यांना फक्त "पोर" असें म्हणत. नंतर ते कांहीं वर्षे गुप्त झाले, व सोळा वर्षांचे असतां धुप खेड्यांतील

चांद पाटलाच्या भाच्याच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर खंडोबाच्या देऊळीं आले. त्या वेळेस " साई " हें नांव पडलें.

म्हाळसापतीच्या खळीयाशी ।
आरंभी बाबा वऱ्हाडानिशीं ।
उतरल्या दिवशीं हें पडलें ।। अध्य. ५, ओ. २६, साई सच्चरित्र

हे बाल फकीर गाडींतून उतरले ।
प्रथम भक्ताच्या दृष्टीस पडले ।
या " साई " म्हणून सामोरे गेले ।
नाम पडलें तेथून ।।

पंचमहाभूतांचा आधार घेतल्याशिवाय जिवाला नयनगोचर स्वरूप प्राप्त होत नाहीं, म्हणून साई स्थूल देहानें प्रगट झाले.

साई—याचा अर्थ स + आई. निर्गुण परब्रह्माचें सगुण प्रतीक–राम–जसें ' अहम् ' = श्रीकृष्ण–आत्मा. अ + हम्. अ = शून्य, निर्विकार, आकाश – त्या आकाशांत. वाणी ' हम् ' स्फूर्तिरूपानें प्रकट झाली. ती ' अहम् ' बनली, व पुढें 'अहम्' हे वर्तूं लागल्यामुळें अहम् ही वृत्ति बनली. तसेंच स = सत्य, परमात्मा. ( सद्गुरु, सद्वृत्ती ) आई = माऊली, प्रेम.

निर्गुणांतून " साई " सगुणांत भक्ताकरितां आले. भक्त झाला कीं देवाला देवपण आलें, देव जरी भक्ताहून श्रेष्ठ व पुरातन असला तरी भक्ताखेरीज देवाला " देव " नांव मिळत नाहीं. म्हणून भक्त आधीं मग देव.

परमात्मा हा सत्य, नित्य, सदानंद आहे. परंतु त्याला तो आनंद, ते सुख, जिवन-रूपानें होतें. म्हणून जीव प्रतीतरूप आहे. जिवाचा आणि शिवाचा ( परमात्मा–साई ) असा अखंड संबंध असल्यामुळें अतएव जीव हा–सत्यांतून–सुखांतून–शिवांतूनच निर्माण झाला असल्यामुळें प्रत्येक जीव सुखाकरितां धडपड करीत आहे, आणि हा शोध प्रपंच आणि परमार्थ या दो वाटांनीं सारखा चालू आहे.

हा शोध ज्या वेळेस जीव ज्या ठिकाणाहून प्रतित रूपांत स्फुरण पावला त्या ठिकाणीं परत जाईल—सागरांत मिठाच्या खड्याची जी अवस्था त्या अवस्थेंत जाईल, आणि ह्या करितांच, भक्तिमार्ग–आणि तो सुद्धां–सगुण भक्ति-हरिनाम, हरिपाठ–असा सरळ सोपा मार्ग आपणांस संतांनीं घालून दिला आहे.

नामाचा महिमा आगाध आहे. संतश्रेष्ठ मुनी नारद यांनीं वाल्या कोळ्याला ' मरा ' असा उलट उच्चार दिला, परंतु त्याचा परिणाम वाल्या कोळ्याचा हृदयीचा राम प्रगट झाला व तो वाल्मिकी झाला. " गौ " म्हणजे इंद्रियें व त्यांचें कूल म्हणजे " अंतःकरण " तें गोकूळ–ज्या अंतःकरणांत अक्षय सुखाचा उदय होतो त्याच क्षणींच जीव आनंदांत मुरून जातो.

'रामकृष्ण हरी' "रामकृष्ण हरी" हीं अक्षरें जिवाचा भाव दाखवितात. जिवाला जीवपणा या नाममंत्रानेंच आला.

'राम' – जिवामध्यें जीवपणें नटणारा,–नांदणारा जो तो "राम."

कृष्ण – देहइंद्रियांच्या सर्व वृत्ति हृदयाच्या ठिकाणीं आणून त्यांचें "कर्षति" रूप करणारा,–विरोध करून आनंद प्रसवणारा जो तो "कृष्ण" आणि हे दोघे ज्या प्रेमाच्या आसनावर विराम पावतात त्या ऐक्यस्थानास "हरि" असें म्हणतात.

श्री सद्गुरु साईबाबांनीं, आपल्या नांवांत 'श्रीराम' दाखविला, आणि म्हणूनच, ते स्वतः "साई साई" म्हण असे आपलें नांवच घेण्यास सांगत.

एका मराठी अज्ञानी, वेडसर, ठेंगू, झिंज्या पसरलेली पण हंसतमुख, पायास सदासर्वकाळ चिंध्या बांधलेली, जिला बाबा "म्हाळी" म्हणून हांक मारीत तिला बाबांनीं 'साई साई' म्हण असें सांगितलें.

हिचें माहेरचें नांव राधा व सासरचें नांव रेऊ, नवऱ्याचें नांव नामदेव आबा सावंत; ही संगमनेर गांवाजवळ कसरवडी नांवाचें एक खेडें आहे, तेथील राहणारी. हिचें लहानपणींच लग्न झालेलें होतें, परंतु ही नवऱ्याजवळ कधींच राहिली नाहीं. ही पंढरपूर, जेजुरी, आळंदी, चांगदेव, वगैरे वगैरे क्षेत्रांत वेड्यासारखी भटकत फिरे. शिरडीला बाबा आल्यापासून ती बाबाकडे आली व तिची बाबांवर निस्सीम भक्ति जडली. त्या दिवसापासून ती शिरडींतच राहिली.

ही जंगलांत जाई व दररोज नियमानें जंगली तरवंडीचीं फुलें— ज्याला सुवास नाहीं अशीं आणून त्यांच्या माळा करी व बाबांच्या गळ्यांत घाली. बाबा सुद्धां त्या प्रेमानें घालून घेत. श्री प्रभू रामचंद्राला सुद्धां शबरीचीं उष्टीं बोरें प्रिय झालीं. कां, तर— निर्मळ प्रेम त्यांत होतें म्हणून.

बाबा एकदां म्हाळसीला म्हणाले, "म्हाळे, (१) मी तुझें कल्याण करीन. (२) तुला एक बोट देईन. (३) तुझा जो कोणी राग करील त्यांच्याजवळ मी राहाणार नाहीं. (४) म्हाळे, मी तुला दागिने देईन (५) एक रुपया, (६) दोन रुपये, (७) पांच रुपये देईन. (८) तुझ्याजवळ राहीन, (९) तूं कांहीं करूं नक. (१०) साईबाबा साईबाबा म्हण," बाबा तिला जेवूं घालीत पण पैसे मात्र देत नसत.

ही अलीकडेच स्वर्गवासी झाली. बाबांच्या पश्चात सुद्धां ही भिक्षा मागून खाई. तिची एकच बडबड, एकच मागणी असे.

"बाबा माझ्या पोटाला द्या बरं कां, मला पगार चालू करा, माझा सांभाळ करा, तुमचा जोडा जन्माला जाईल, तुम्हांला पांच नातू होतील, तुम्ही सुखाचे रहा, तुमचे शाईबाबा कल्याण करील, मला लुगडें द्या बरं कां, मला पगार चालू करा."

हिच्या जिव्हाग्री 'शाईबाबा' हें नाम जणूं काय हिचा जपमंत्रच बसला होता. श्री साई तिचें दैवतच झालें होतें. ती नेहमीं नित्य "शाईबाबा, शाईबाबा" म्हणें. त्याचा परिणाम असा झाला कीं, तिला काव्य करण्याची स्फूर्ति झाली.

# काव्यें

देव शाईबाबा आहे सत्वशील। आहे सत्वशील। अहो रामा ।। पांगळ्याला पाय, आंधळ्याला दिल डोळ । आंधळ्याला दिल डोळ ।। अहो रामा ।। चांदिचे गंगाळ मोत्यांची चुंबळ । मोत्यांची चुंबळ ।। अहो रामा ।। सूर्यासमूक शाईबाबांची आंघोळ । शाईबाबांची आंघोळ ।। अहो रामा ।। १ ।।

देव शाईबाबा नवसाला पावत । नवसाला पावत ।। अहो रामा ।। गांवा गाईंचे [ गांवींचे ] लोक आले शिरडीला धांवत । शिरडीला धांवत ।। अहो रामा ।। गांव शिरडी चढली नांवाला । चढली नांवाला ।। अहो रामा ।। ऐकत नाहीं पांच पन्नास गांवाला । पन्नास गांवाला ।। अहो रामा ।। २ ।।

चोळी बाळकोटी [ बाणकोटी ] लुगडे घेतलें मिराणी । घेतलें मिराणी ।। अहो रामा ।। केली बोळवण देवा शाई बाबांनीं ।। देवा शाईबाबांनीं ।। अहो रामा ।। कुरळ्या केसाचे भांगी [ भांग ] पडतील वाक । पडतील वाक [ वांकडे ] ।। अहो रामा ।। देवा माझ्या शाईबाबा समारता [ समर्था ] मी तुमची लेक । मी तुमची लेक ।। अहो रामा ।। ३ ।।

देवा माझ्या शाईबाबा, धरीन तुमचे पाईं [ पाय ] । धरीन तुमचे पाईं ।। अहो रामा ।। माझ्या दैवाकडे [ कडे ] नेत्र उघडून पाही । नेत्र उघडून पाही ।। अहो रामा ।। देवा शाईबाबा माझा भाव तुमच्यावर । माझा भाव तुमच्यावर ।। अहो रामा ।। म्हणून तुम्ही माझे नशीब केलें थोर । नशीब केलें थोर ।। अहो रामा ।। ४ ।।

गांव शिरडी, शिरडी शिरापूर । शिरडी शिरापूर ।। अहो रामा ।। मागें चाले शाई बाबा पुढें चाले चोपदार । पुढें चाले चोपदार ।। अहो रामा ।। गांव शिरडीचा गल्ली गल्लीं कंदील । गल्ली गल्लीं कंदील ।। अहो रामा ।। देवा शाईबाबा चोपदाराला मंदील चोपदाराला मंदील ।। अहो रामा ।। ५ ।।

देवा मध्यें देऊ ( देव ) शाईबाबा खरा । शाईबाबा खरा ।। अहो रामा ।। ठाव नाहीं याला अस्तुरीचा ( स्त्रिचा ) वारा । अस्तुरीचा वारा ।। अहो रामा ।। इथून दिसतो शाईबाबांचा बंगला । शाईबाबांचा बंगला ।। अहो रामा ।। चांदिचे तबक पेढे वाटितो रंगेला । वाटितो रंगेला ।। अहो रामा ।। ६ ।।

व शाईबाबा अगिनीचें घर । अगनीचें घर ।। अहो रामा । उदय ( ऊद ) कापूर आरती जळे थीर । आरती जळे थीर ( स्थिर ) ।। अहो रामा ।। अहो शाईबाबा सत्याचा पुरूस । सत्याचा पुरूस ।। अहो रामा ।। रामनवमीला याचा भरतो उरूस । याचा भरतो उरूस ।। अहो रामा ।। ७ ।।

देवा शाईबाबा लई दिसाचा म्हातारा । लई दिसाचा म्हातारा ।। अहो रामा ।। चैताच्या महिन्यांत याची भरती जतरा । भरती जतरा ।। अहो रामा ।।

॥ देव शाईबाबा मशीदींत उभा होता मशीदींत उभा होता । अहो रामा ॥ माला उमज ना याच्या मुसलमानी बाता । याच्या मुसलमानी बाता । अहो रामा ॥८॥

देव शाईबाबा येसी मंधी ( वेशीमध्यें ) उभा राही । येसी मंधी उभा राही ॥ अहो रामा ॥ पान फुलासाठीं वाट मुजवराची ( पुजारी ) पाही । वाट मुजवराची पाही ॥ अहो रामा ॥ शिरडीच्या येसी मंधी दंगा कशीयाचा ( कशाचा ) झाला । दंगा कशीयाचा झाला ॥ अहो रामा ॥ शाई बाबाच्या दर्शनासा तांगा शिपायाचा आला । तांगा शिपायाचा आला ॥ अहो रामा ॥९॥

डोईवर घागर मी जाते राग राग । मी जाते राग राग ॥ अहो रामा ॥ देव माझे शाईबाबा देव येती माग माग । देव येती माग माग ॥ अहो रामा ॥ कोपरगांवा जाया निमगांवांची वसती । निमगांवाची वसती ॥ अहो रामा ॥ शाईबाबांची मांडी कळसाची दिसते । कळसाची दिसते ॥ अहो रामा ॥१०॥

गांव शिरडीचा व्हईन मीं खराटा । व्हईन मी खराटा ॥ अहो रामा ॥ येतील साधुसंत झाडीन चारी वाटा । झाडीन चारी वाटा ॥ अहो रामा ॥ गांव शिरडीची व्हईन मी बाभूळ । व्हईन मी बाभूळ ॥ अहो रामा ॥ साधु-संत येती वर ॥ फेंकीन मी तांदुळ ॥ फेंकीन मी तांदुळ ॥ अहो रामा ॥११॥

देव शाईबाबा कधी मजला भेटल । कधी मजला भेटल ॥ अहो रामा ॥ मज दुबळीचे कधीं दारिद्र हटेल । कधीं दारिद्र हटेल ॥ अहो रामा ॥ माझ्या दुःखाला शाईबाबा साह्य झाला । शाईबाबा साह्य झाला ॥ अहो रामा ॥ आनंदाची घडी मिळाली माला । घडी मिळाली माला ॥ अहो रामा ॥१२॥

नवस बोलले शाईबाबाच्या वाड्याला । शाईबाबाच्या वाड्याला ॥ अहो रामा ॥ बैल बंधुचे तकतरावाच्या गाड्याला । तकतरवाच्या गाड्याला ॥ अहो रामा ॥ नवस बोलले शाईबाबा घाई घाई । शाईबाबा घाई घाई । गाड्यांवर गल्फ ( गलेफ )बंधु माझा चाल पायीं ॥ चाल पायीं ॥ अहो रामा ॥१३॥

देव **शाईबाबा** कोण्या नारीला पावला । नारीला पावला ॥ अहो रामा ॥ सवा मणाचा मलीदा त्याला गलफ वाहीला । त्याला गलफ वाहीला ॥ अहो रामा ॥ गांव शिरडीमंधी मी गेले सभागती ( प्रभाती ) । मी गेले सभागती ॥ अहो रामा ॥ देव शाईबाबा तिथ काकड आरती । तिथ काकड आरती ॥ अहो रामा ॥ १४ ॥

[ तकतरावः—चार चाकी गाड्यावर, एक काळ्या कापडाचा भुसा भरून हत्ती करून, त्यांत अंबारी घालून तमाशा करणें व गांवांत मिरवणूक काढणें या सोंगास तकतराव असें म्हणतात. ]

वरील कवनांत भाषा अशुद्ध असली आणि कवनास वृत्त नसले तरी हिच्या कवनास कडवी व चरण आहेत. अर्धी दुगण व एक पालुपद आहे. हिला शिक्षणाचा गंध नाहीं, वाचन, श्रवगसुद्धां नाहीं अशी परिस्थिति असतां, हिचें कवन अर्थपूर्ण-

भावनाप्रधान व प्रेमरसानें ओथंबलेलें आहे, हा केवळ नामजपाचाच महिमा. हें कवन वाचल्यावर हिला वेडी कोण म्हणेल ! तिनें श्री शाईबाबा,–सत्वशील, सत्य पुरुष, व आजन्म ब्रह्मचारी, अग्नीरूप मानलें आहे. तसेंच बाबा नवसाला पावतात अशी आपली श्रद्धा व भाव प्रगट केला. आपणां स्वतःला तिनें खराट, बाभूळ, संबोधिलें आहे. ही शेवटची दास्यत्वाची कल्पना खरोखरच उदात्ततम आहे.

ह्या म्हाळशीच्या चरित्रावरून हें स्पष्ट होतें कीं, ' नाम ' आणि तें " सांईबाबा "– " राम " अगर ' रामकृष्णहरी ' ह्या सारखेंच मोलाचें आहे. त्या नांवांत अर्थ आहे.

श्री सांईबाबांनी म्हाळशीला केलेल्या उपदेशांत किती खोल अर्थ आहे, त्याचा प्रत्येक सांईभक्तांनी जर त्याचा विचार केला तर !

( १ ) बाबांनीं प्रेमभक्तीचें रहस्य सांगितलें.

( २ ) तुला दागिने देईन, = पुण्य = पैका = पुण्य, गांठीं पुण्य असणें हाच खरा दागिना.

( ३ ) १ रुपयाः—अद्वैत,–जीव अद्वैतातून, एकातून, शिवातून, सत्यातून, साईतून आला.

( ४ ) २ रुपयेः—द्वैत–शिवानें–आपला आनंद–भोगण्याकरितां, पुरुष + प्रकृती निर्माण केली, त्याला " एकोऽहम् बहुस्याम् " होण्याची इच्छा झाली = इच्छेची वासना होऊन प्रकृती आणि अहम् पुरुष बनला.

( ५ ) पांच रुपयेः—पंचतत्वें–पंचमहाभूतें. देह हा पांच महाभूतांचा आहे.

( ६ ) तूं कांहीं करूं नकोः–<br>
( ७ ) सांईबाबा साईबाबा म्हण. } नुसतें नाम घेतलेस आणि ते शुद्ध प्रेमानें घेतलेंस, म्हणजे स्थूल देहाचीं इंद्रियें आपोआप आकर्षलीं जातील व तो पंचमहाभूतांचा देह ताब्यांत राहून, ' अहम् ' कृती ( गर्व ) समूळ नाहींशी होईल, व मग द्वैताचा भास जाऊन अद्वैतपणा शिल्लक राहील, मी–तूं पणा विसरला जाऊन राग द्वेष हे षड्रीपू ताब्यांत राहातील. मग मी तुझ्याकडे राहीन, = मी. कोण ह्याचा अर्थ ज्ञान, आत्मज्ञान होईल.

पंडितांच्या पांडित्याच्या अवडंबरांत देव गुरफटून जात नाहीं. ज्ञानाच्या व ध्यानाच्या पलीकडे असणारा देव, जपातपाच्या, यज्ञयागाच्या, जयाची सोय वेदा नाकळे एवढा आवांक्याबाहेर असलेला देव, अशक्य कोटींतील देव नामोच्चाराच्या योगें भक्त नाचवूं, खेळवूं, राबवूं शकतात. नामाच्या योगें भाक–निष्ठा प्रकट होते, देवास भावाशिवाय दुसरें कांहीं नको.

श्री बाबांनीं स्वतःला ओळखण्याची ही शिकवण किती सोपी व सरळ सांगितली व तिची ओळख पटण्याकरितां फक्त ' साईबाबा ' साईबाबा हा नाममंत्रच सांगितला.

संपादक

# —: अनुभव :—

(१)

श्री मु॰॥ मडू

ता. २१।१०।४९.

श्री. मॅनेजरसाहेब, संस्थान शिर्डी यांसीः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि.

आपणांकडे खालील अनुभव या हेतूनें पाठवीत आहें, कीं आपणांस जर ही हकीकत साईलीलेंत छापविणें योग्य वाटल्यास तसें परस्पर करून लीलेचा तो अंक मजकडे व्ही. पी. नें पाठविण्याची कृपा करणें.

१ मला व घरांतील मंडळींस श्रीगुरुउद्धवेश महाराज रानडे यांचे अनुग्रहानें श्रीसद्गुरु साईबाबांच्या प्रसादाचा लाभ सन १९२४ पासून घडला असून तो आजपर्यंत अव्याहत चालू आहे. श्रींची आम्हीं उभयतां प्रेमभावें सेवा करीत आहोंत. या इतक्या अवधींत बाबांचे अनुभवाचा लाभ घडल्यानें आमची त्यांचेवर दृढ भावना बसली असून ती अखंड कायम राहून आम्हांवर त्यांची पूर्ण कृपा रहावी हीच त्या माऊलीचे चरणीं नम्रभावें विनंति आहे. घरांतील लहानापासून थोरांपर्यंत आमचे सर्वत्र मुलाबाळांना बाबांच्या भक्तिभावाचें प्रेम आम्हांप्रमाणेंच आहे. असो.

सन १९४६ त आमच्या वडील मुलास मलेरियाचें औषध चालू होतें व त्याच्या कुटुंबास पेटंट मेडिसिनचें टॉनिक चालू होतें. मुलास औषधाचे रोज तीन डोस दिले जात व सूनबाईस टॉनिकचा खुराक चहाच्या एक चमच्याचे प्रमाणांत होता. एके दिवशीं चिरंजीवाचे औषधाचा एक डोस जो रात्रीं निजतेवेळीं घेण्याचा राहिला होता तो डोस रात्रीं घेतेवेळीं चुकून त्याच्या पत्नीच्या बाटलींतील १६ चमच्यांचा पुरा डोस दिला गेला. त्यामुळें त्याच्या तोंडापासून पोटापावेतोंच्या भागाचा दाह होऊं लागला. त्यामुळें तो मोठ्यानें ओरडावयास लागला. त्याच्या आईनें (आमच्या सौभाग्यवतीनें) दुसरा तिसरा कांहीं इलाज न करतां श्रींचें नामोच्चारण करून, बाबांची उदी पाण्यांत घोळून मुलांस पाजली तोंच चमत्कार असा झाला कीं, उदीचें पाणी पोटांत जातांच त्यास भडभडून मोठी वांती होऊन पोटांत गेलेला बहुतेक औषधाचा भाग बाहेर निघाला. त्यामुळें दाह बराच कमी झाला. आणखीही एक दोन वांत्या झाल्या. तोंडापासून घशाचा भाग औषधांतील कांहीं दाहक औषधानें भाजला गेल्यानें त्याला दुसरे दिवशीं डॉक्टरना दाखविलें. डॉक्टर म्हणाले, "औषधांतील जहराचा परिणाम वांती झाल्यांनें जिवास धोका होण्यापासून वांचला. फार लौकर सांवरले गेलांत." औषधाच्या दोन्हीं बाटल्या एकाच रंगाकृतीच्या असल्यानें व त्या एके ठिकाणींच ठेवल्यानें हा असा प्रसंग निमार्ण झाला.

श्री सद्गुरु साईमाऊलीचे कृपेनें आमच्या मुलाच्या जिवावरचा घात गेला. धन्य आहे आमच्या माऊलीच्या उदीप्रसादाची.

२ आमची सून (याच वडील चिरंजीवांचें कुटुंब) ७।८ दिवस मलेरियानें आजारी होती. तापाचें प्रमाण १०१ ते १०३ वर राहात असे. तिच्या आजारांत आम्हीं बाबांचा फोटो तिच्या निजावयाचे जागीं भिंतीस लावला. हेतू एवढाच कीं, तिचा आजार लवकर निघून जावा. फोटो लावल्यापासून दुसरे किंवा तिसरे दिवशीं तिचा ताप उतरून तिला बरें वाटूं लागलें. अशक्तता मात्र तशीच होती. ताप उतरल्याचे ७–८ वे दिवशीं रात्रौ ९–१० वाजतां म्हणजे ता. २८–१०–४९ ला सूनबाई नित्याप्रमाणें फोटोचें दर्शन घेत असतां तिला फोटोचे आंत बाबांचे छातीपासून वरील सर्व भागास मनुष्यास जसें घामाचे ओघळ येतात तसें दिसलें. तिला त्याचें आश्चर्य वाटून तिनें आम्हांस या चमत्काराची सूचना देतांच आम्हीं सर्वत्रांनीं तो चमत्कार बघितला व लागलींच धूप दाखवून फोटो काढून त्याचे पाठीमागील भागाची व भिंतीची, कांहीं ओलावा आहे कीं काय याची तपासणी केली. परंतु आम्हांस दोन्हीं भागांस शीतपणाचा कांहींच भास झाला नाहीं. शेवटी फोटो फ्रेमचे बाहेर काढून पाणी पुसून काढून व कांच वगैरे साफ करून पूर्ववत् जमवून त्याच ठिकाणीं लावून दिला. परत दुसरे दिवशीं रात्रीं ७–८ चे सुमारास तोच प्रकार दिसला तेव्हां मुलास सुचिर्भूत करवून त्याच फोटोची त्याच्याकडून पूजा करवून घेतली व माफीस्तव प्रार्थना केली, व याचा खुलासा स्वप्नद्वारें करण्याची त्यांना प्रार्थना केली. अजून कोणासही कांहींच खुलासा न झाल्यानें श्रींचे महासमाधीपाशीं तशी विनंति करून कांहीं खुलासा झाल्यास समजून घेण्याच्या हेतूनें सर्व हकिगतीनें आपणांस तकलीफ दिली आहे, त्याची माफी करून उत्तरीं खुलासा करण्यास्तव या सोबत माझें पत्ता लिहलेलें कार्ड पाठवीत आहें. चि. सौ. सूनबाईस आतां ताप नाहीं पण अशक्तता विशेष असून मधून मधून डोकें दुखणें, खोकला वगैरे सारखीं किरकोळ दुखणीं अजून आहेतच. त्यामुळें काळजी वाटते.

जास्त काय लिहूं. ताजे अनुभव आपणांस यथावत कळवीत आहे. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपलाच
सदाशिव शंकर दिघे

(२)

॥ श्रीगणेश ॥

ओक यांचा वाडा
२७९ शनिवार, पुणें.
ता. ११–१०–४९

श्री. रा. गव्हाणकर, संपादक श्रीसाईलीला यास. स. न. वि. वि.

खालील अनुभव आपण श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

मला स्वतःला आज नऊ वर्षांत मूल नव्हतें, नऊ वर्षे सौ. सारखी आजारीच आहे. लहानमोठे डॉक्टर, वैद्य, खाजगी बाया वगैरेंची सर्व औषधें केली. प्रत्येक जण एकच सांगे कीं, बाहेरून जरी अशक्तता दिसली तरी घाबरण्याचें कारण नाहीं. प्रत्येक जण औषध देत परंतु गुण नाहीं. त्यानंतर आज तीन-चार-वर्षे माझे एक स्नेही मला असें सांगत होते कीं, " जोशीबुवा ( हें माझें नांव आहे. ) तुम्हीं शिरडीला जाऊन समाधीला प्रार्थना करून या. तरी सुद्धां माझी अशी कल्पना होती कीं, जर नवस करून मुलें होतीं तर या जगांत निपुत्रिकच कोणी दिसले नसते. दुसरें असें कीं, देवावर संकट घालून दोष काय म्हणून द्यावा.

तेच माझे स्नेही, सुमारें नऊ महिन्यांपूर्वी एक दिवस माझ्याकडे आले व नेहमीं-प्रमाणें माझे मंडळींची खुशाली वगैरे विचारूं लागले. अर्थात्च-मागील अंकावरून पुढें चालू-असें मी उत्तर दिलें. त्याबरोबर ते असे म्हणाले कीं, मी माझ्यापदरचे पैसे खर्च करून, वाटेल तें करून तुम्हां दोघांना मोटारींत घालतों व श्रीसाईंच्या समाधीपुढें नेऊन एकदां आणतों " व निघून गेले. लगेच त्याक्षणापासून माझे मनांत विचार सुरू झाला व त्याच दिवशीं श्रीसाईबाबांची मूर्ति मनांत आठवून त्यांना सांगितलें " सौ. वतीची तब्येत व संतती यांत सुधारणा करणें असेल तर याच महिन्यापासून करा तरच आम्हीं ( मी ) तुम्हांस बाबा म्हणूं. कारण तुमची कीर्ति लोक फार गातात. अगोदर मला अनुभव आला तरच मी आपल्या दर्शनास येईन. " पण श्रीसाईंनीं अक्षरशः माझे दांत माझ्याच घशांत घातले. त्याच महिन्यापासून सौ. ची प्रकृती चांगली झाली. आतां अंदाजें १५ दिवसांत बाबांच्या कृपेनें ज्या रत्नाचा लाभ होणार आहे तें पुत्ररत्नच असेल अशी खात्री आहे. सौ. ची प्रकृति नऊ महिन्यांत अगदीं उत्तम आहे व सर्व पैशांच्या अडचणी बिनबोभाट पार पडल्या आहेत. सौ. ला तिसरा महिना सुरू झाल्यानंतर मात्र ती शिरडीला जाऊन दर्शन घेऊन आली पण माझा योग मात्र अद्याप आला नाहीं. मीं साईचरित्राचा सप्ताह केला. मी आपल्या श्रीसाईलाल मासिकाचा वर्गणीदार अ हे. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या महिन्यांचा त्रैमासिकाचा अंक मात्र मिळाला नाहीं. तो अवश्य पाठवून द्यावा. दुसरें म्हणजे १५।२० दिवसांनंतर बारसें येईल त्या दिवशीं खुद्द शिरडीहून मुलाचे गळ्यांतील ताईत व बोटांतील आंगठी अर्थात श्रीसाईंची प्रतिमा असलेलीच पाहिजे तेव्हां उद्दीष्ट वरील जिन्नस आपण जर व्हि. पी. नें अगर इतर कुणाबरोबर, मला मिळणें कसें शक्य आहे तोही खुलासा करावा. त्रासाबद्दल माफी असावी. परंतु वरील मुदतींत येथें मला मिळेल असें करावें. एकंदर सविस्तर उत्तर द्यावें. वाट पहात आहे. वरील वस्तुसंबधीं मला पत्र पाठवावें. नाहींतर मग दुसरी व्यवस्था करणें बरें पडेल. कळावें.

आपला,

पी. आर. जोशी

॥ श्रीसाई प्रसन्न ॥

ओक यांचा वाडा.
२७९ शनिवार
पुणें ता. १५।१५।४९

श्री. रा. डॉक्टर साहेब यांना स. न. वि. वि.

आज रोजीं आपणांस मुद्दाम पत्र पाठविण्याचें कारण कीं, १३।११।४९ रोजीं सकाळीं १० वाजून ३५ मिनिटांनीं श्री साईकृपाप्रसादानें मला पुत्ररत्न झालें आहे. "बाकी यापूर्वींची केवळ श्रीसाईच्याच कृपेनें ९ वर्षें गेल्यावर" सर्व हकीगत मी या पूर्वीच आपणांस कळविली आहे व आपण ती सर्व त्रैमासिकांतून प्रसिद्ध करणार होतात परंतु आपलेकडून अंक २।३ दिवसापूर्वी आला तो पोंचला. परंतु यामध्यें ही हकीगत नाहीं. माझ्या मतें माझेकडून मुलगा–मुलगी वगैरेंचा रिपोर्ट आपणास गेला नसल्यानें आपण ती हकीगत छापली नाहीं असें वाटतें व तेंही आपलें बरोबरच आहे. दुसरी माझी इच्छा अशी होती कीं, मुलाचा जन्म गुरुवारीं तरी व्हावा किंवा बारसें तरी गुरुवारीं यावें. श्रीसाईंनीं तीसुद्धां इच्छा पूर्ण केली. कारण १३।११।४९ रविवारीं जन्म झाला म्हणजे गुरुवारींच बारसें येत आहे. असो, आम्हां सर्वांवर संपूर्ण कृपा ठेवावी असें आपणही आमचे तर्फें श्रीसाईंना सांगत रहावें. कळावें, आम्हां सर्वांचा आपणांस सप्रेम नमस्कार.

आपला
**पी. आर. जोशी, पुणें**

3

My son Keshav, who had served in military for 6 years after return from military services, served in Employment Exchange of Hubli for 2 years. But in December 1948 he was served with a notice, that his services are not required, and will be terminated, as he is not qualified; and got himself discharged on 28 th, February 1949. I asked him to read **Gurucharitra** and complete **Saptah** in 7 days, with full faith in Shri Sai Baba, Who knows better than us and does everything for the good of us and not to be morose & unhappy. By the time he finished his **Saptah**, Baba came running for his help in the form of an order from the Bombay Head Office; whether he was willing to get his present services transfered to Kolhapur in Shivaji Technical Training Centre as hostel clerk; which he gladly accepted. This is another proof of showers of Baba.

4

My another Sister-in-law ( भाची ) Yankai alias Seetabai, who is a young widow of 30 years, with 2 children, had to leave her

husband's house, on account of poverty and other difficulties. She got shelter in my house for 2½ years. Her education before her marriage was only up to primary Marathi 3 rd standard; which she had totally forgotton, being out of touch for so many years. However I tried for her in the local government dispensary and got admission to under-go Training for Dai's course of 3 months, where though she served for an year could not get the required certificate on account of present day tendency of Lady Doctors and others. Then she got a job in other local Hospital for 2 months, and got discharged again for weak sight and other underhand dealings. She was so much unhappy, and got sick. I then asked her to complete Babas स्तवनमंजिरी daily with fresh devotion far 7th days, and see what He will do for you. After finishing that **Saptah** she got a job of a nurse in Hukeri Road sanitorium, an envious and healthy place, with no night duty. Her work is so satisfactory there; all her superiors are down pleased with her work. This is the 3 rd instance where Baba showed that He is all living and comes running for the call of his devotces.

(5)

My fifth extension and last one, was sanctioned last year in October 1948, and received a order of Transfer to Poona in December 1948. I requested the circle office to transfer me at Hubli, as it would be very hard to get residential quarters in big cities like Poona & other places. Besides I was retiring this year only. They refused that if I am inconvenienced & put to hardships; I may put in an application for retirement. There was no other course for me but te fall at Baba's feet at **Shirdi**. I went to **Shirdi**, and returned to Hubli. My application was reconsidered and change of orders were received shortly to transfer me at Hubli till my retirement.

( from Mr. S. B. Jamkhindi, Post-Master Hubli. )

---

# —: श्री साई भजन माला :—

## " प्रासादिक अभंग "

( १ )

सत्य हेंची रुप धरीं नारायण ।
श्रुती स्मृती सारे बोलती प्रमाण ॥ १ ॥

सत्य हाचि धर्म सत्य हेंचि कर्म ।
आचरोनी नर होई नारायण ॥ २ ॥
केशवाधार सत्य साई जाण ।
परब्रह्म सत्य सत्य नारायण ॥ ३ ॥

( २ )

काय वानूं साईरंगा राधाधरछंदा ।
करंट जीवित गोड करीं तूं गोविंदा ॥ १ ॥
धन-ज्ञान-पैका बारे देशी सुखानंद ।
विष सम असें तेचीं नको लावूं छंद ॥ २ ॥
काय मुचकुंदोधारा वदूं मी मुकुंदा ।
प्रेम भक्ति पूर्णानंद हृदयीं दे मिलिंदा ॥ ३ ॥
आनंदाचा कंद तूं बा जय श्री गोविंदा ।
केशवाला भक्तिरस पाजी तूं स्वछंदा ॥ ४ ॥

( ३ )

यंत्र कळीचे केलें साई दिसतें किती छान ।
परम चारुता बघतां त्याची होई चित्तभान ॥ ध्रु ॥
उंचि तिची औट हात परी बसे आंत नाथ ।
नाना परीचे खेळ खेळुनी चित्ता दे साथ ।
साई किल्ली हाती ठेवुनी करीं चालु रथ ।
हेंची जाणुनी 'मीच' चालवी बोले अभिमान ॥ १ ॥
यंत्रा होई विश्वजननीचें पूर्ण ज्ञान बाई ।
यंत्राचा अवतार संपला पुनरपी न होई ।
दृढ भक्तिच्या आधारें कीं होई पूर्ण साई ।
" सांई सांई " म्हणीत केशव विसरे देहभानें ॥ २ ॥

( ४ )

घनःशाम सुंदरा मनोहर रूप मला दावी ।
वेणूमाधव कृष्णकन्हया झडकरी ये धांवी ॥ १ ॥
मुरलीधर तूं कुंजविहारी काय करूं मी तरी ।
संसारीं विटलेलों आम्हीं वाट दाव तूं बरी ॥ २ ॥

साईनाथा जगन्नाथा आदीनाथा हो ।
दीनदुबळे आम्ही आलों तुझ्या दारीं हो ॥ ३ ॥
कृपासागरा करुणागारा पूर्ण चंद्रबींब ।
केशव टाकी ओंवाळूनी देह जसे लिंब ॥ ४ ॥

( ५ )

याहो याहो याहो तुम्ही याहो सारे जण ।
घनः शाम कृष्ण साई पाहूं या आपण ॥ १ ॥
दया क्षमा शांती नांदे सिद्ध असे वाणी ।
चिंतिलेले देई प्रेमें आहे चिंतामणी ॥ २ ॥
'नेती नेती' वेद बोले पूर्णब्रम्ह सत्य ।
कळों आलें अनुभवें साई ब्रह्म सत्य ॥ ३ ॥
नका करूं अविचार पूर्ण भाव ठेवा ।
ओरडूनी केशव सांगे पहा अनुभवा ॥ ४ ॥

( ६ )

कोणी वंदो कोणी निंदो । चित्त साई चरणीं नांदो ।
नाहीं चिंता मग बंधो । चित्त होई कीं गोविंदो ॥ १ ॥
साई आनंदाचा कंद । कृष्ण परत्मा मुकुंद ।
लागो नामाचा त्या छंद । होऊं सांई नामें धुंद ॥ २ ॥
साई ऐश्वर्याची खाण । ऐसी नाहीं दुजी जाण ।
खणा खणा सारे जण । चला जाऊं या आपण ॥ ३ ॥
सुख दुःख नाहीं तेथें । भरे पूर्णानंद माते ।
हृदय डेरे करा रीते । भर चिदानंद तेथें ॥ ४ ॥
नको मान अपमान । विषयांचे नको ज्ञान
जठरी घाला अनुदीन । शुद्ध कृष्णामृतपान ॥ ५ ॥
दुष्ट सुष्ट को जाणती । खऱ्या भक्ता नाहीं मती ।
साई—आत्मा एक चित्ति । पाही केशव सर्वांती ॥ ६ ॥

( ७ )

येवोत बाळ हा कुणी । सखे ग साई ग माझा गुणी ॥ धृ ॥
गोंडस छकडें बाळ मोकिरें ।

मोहून कर्षी आनंद भरे ।
दुड दुड धांवत चाले अंगणी । हा मुकुंद माझा गुणी ॥ १ ॥
स्थूल देही गोपी ना बघत ।
सूक्ष्मीं मात्र कीं हांसे खेळत ।
उडी घेऊनी जाई कारणीं । सखे बाळग माझा गुणी ॥ २ ॥
महाकारणीं दडुनी जाई ।
मस्तकीं धुंदी त्याच्या पायीं ।
उमज पडेना कुणाचा कुणी । असा बाळग माझा गुणी ॥ ३ ॥
आनंदे नटला गोविंद ।
जिवा शिवाला लागे छंद ।
अगाध त्या बाळाची करणी । बाईग, मिलिंद माझा गुणी ॥ ४ ॥
जिवा शिवाची करी ऐक्यता ।
भेद नुरे मग त्याच्या चित्ता ।
नगर समदे हे झाले ऋणी । पहा बाळग माझा गुणी ॥ ५ ॥
आनंद कंद बघ साईरंग ।
देहीं देई उडवुनी रंग ।
कशवांतुनी बोले वाणी । कसा पहा सांई ग माझा गुणी ॥ ६ ॥

(८)

पापी अभागी देवा । मी रे ॥ धृ ॥
विनवी तुजला देई बाला ।
सुमती सद्धर्म कर्म मला ॥ १ ॥
पतीत पावन अससी तूं रे ।
सांई प्रभुजी तारी बारे ॥ २
केशव विनवी जीव तोडुनी ।
म्हणवी आपुलासा तूं रे ॥ ३ ॥

(९)

भोळा शिव शंकर । आदी सांईनाथ ।
स्वयंभू प्रसिद्ध । ते अंबरनाथ ॥ १ ॥

साई शिव सत्य । विठ्ठल रखू माई ।
ॐ कार स्वरूप । घाला मिठी पायीं ॥ २ ॥
शिवाचे प्रतीक । नर नारायण ।
शिरडी साई बाबा । आहे नित्य जाण ॥ ३ ॥
शिरडी पंढरपूर । काशी बद्री गया ।
क्षेत्रें महाप्रसिद्ध । लागो आमुच्या पायां ॥ ४ ॥
भक्ति भाव ठेवा ।खावा मधुर मेवा ।
प्रेम तुमचे ध्याहो । बिच्याऱ्या त्या केशवा ॥ ५ ॥

---

## ॥ श्रीदत्तचित्साई सद्गुरुभ्योनमः ॥

शिरडी येथील नेहमीं निवास करीत असलेल्या मशिदीला बाबा द्वारकामाई कां म्हणत याबद्दलचें संशोधनः—

(मागील तीन अंकावरून पुढें चालू)

## बाबांचे उद्गार

१ बाबा प्रथम एकदा माधवराव देशपाड्यांना म्हणाले कीं, शाम्या तुझा व माझा बहात्तर पिढ्यांचा सहवास आहे. तुला त्याची आठवण नाहीं व मला त्याची आठवण आहे.

तसेंच अगदीं पहिल्या भेटींत बाबा नानासाहेब चांदोरकरांना म्हणाले कीं, नाना, तुझा माझा चार जन्मांचा सहवास आहे. मला तो माहीत आहे, व तुला तो माहित नाहीं; म्हणून मी तुला नेहमीं नेहमीं बोलावितों, नाहीं तर जगांत काय नाना थोडे आहेत!

## गीतेवरून श्रीकृष्ण व बाबा यांचेमधील साम्य

" बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ॥
तान्यहं वेद सर्वाणि, नत्व वेत्थ परंतप ॥

श्री. भ. गी. अ. ४, श्लोक ५

**अर्थः**—माझे पुष्कळ जन्म झाले व तुझेही पुष्कळ झाले, फरक इतकाच कीं ते मला सर्व माहित आहेत, तुला माहित नाहींत.

## माधवराव देशपांडे यांची सख्य भक्ति

माधवराव देशपांडे पहिल्यापासून बाबांना 'देवा' म्हणून संबोधित व अखेरपर्यंत त्यांना 'अरे तुरेच' म्हणत. त्यांना वाटेल ते प्रश्न विचारीत. त्यांना अद्वातद्वा बोलत, त्यांना

शपथा घालीत, त्यांना दरडावून सांगत, त्यांच्याशीं गप्पागोष्टी करीत, त्यांना चिलीम भरून देत व आपणही पीत. त्यांच्याशीं भांडत, त्यांच्यावर रुसत व रागवत व कधीं कधीं त्यांना उपदेशाच्या गोष्टीही सांगत. पहिलीं कांहीं वर्षे माधवराव त्यांच्याकडे दैव किंवा संत म्हणून जात नसत. फक्त चिलीम पिण्याकरतांच जात असत. बाबा वेडथर आहेत असेंही त्यांना प्रथम कित्येक दिवस वाटे. बोलण्यांत माधवराव शेवटपर्यंत पुष्कळ वेळां अतिप्रसंगही करीत. पण बाबा केव्हांही न रागावतां त्यांची समजूत करीत व त्यांची आणही वाहात. पुढें पुढें माधवरावांना अनंत अनुभवानें बाबांची खरी योग्यता कळूं लागली, बाबांवर त्यांचा पूर्ण विश्वास बसला, बाबांची वाचा सत्य आहे असें त्यांच्या अनुभवास येऊन बाबांचें सामर्थ्य 'कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुम्' अशा प्रकारचें असून बाबा अतिमानुष अतिमर्त्य आहेत असें समजून ते त्यांना परमात्मा मानूं लागले, व आपण देवाशीं (बाबाशीं) अतिप्रसंग करतों याबद्दल पुष्कळ वेळां त्यांना पश्चात्ताप होऊन वाईटही वाटे. माधवरावांची त्यांच्यावर एकनिष्ठ भक्ति होती व अद्यापही आहे. नारदीय नवविधा भक्तीपैकीं माधवरावांची बाबांवर असलेली भक्ति, आठवी सख्यभक्ति (अर्जुनाप्रमाणें) होती असें मला वाटतें.

"सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण, हे यादव हे सखेति ॥
अजानता महिमानं तवेदम् । मया प्रमादात्प्रणयेन वाऽपि ॥ ४१ ॥
यच्चाऽवहा सार्थमसत्कृतोऽसि । विहारशय्यासनभोजनेषु ॥
एकोऽथवाऽप्यच्युत तत्समक्षम । तक्षामये त्वामहप्रमेयम् ॥ ४२ ॥
श्री. भ. गी. अ. ११.

**अर्थः**—तुमचा हा महिमा न ओळखितां मित्र समजून 'अरे कृष्णा, अरे यादवा, अरे सख्या' असें चुकीनें किंवा सलगीनें जें कांहीं मी अमर्याद बोललों असेन, आणि आहारविहारांत किंवा निजण्या–बसण्यांत, हे अच्युता! एकट्याला किंवा चारचौघांत मी जो कांहीं थट्टेनें तुमचा अपमान केला असेल, त्याची मला क्षमा करावी असें तुम्हा (ज्यांच्या शक्तीचें किंवा गुणांचें मोजमाप करतां येणें शक्य नाहीं) अप्रमेयांजवळ माझें मागणें आहे.

वरील श्लोकद्वयांतील अर्थोद्धार व त्यावर असलेलें श्री ज्ञानेश्वर भाष्य यांत व वरील विवेचनांत पुष्कळ साम्य आहे असें दिसून येईल.

## नानासाहेब चांदोरकरांची संस्कृताहंतेची नष्टता

३ भारतीय युद्धाच्यावेळीं समरंगणावर भक्तराज अर्जुन मोहपीडित झाला असतां जशी त्याला श्रीकृष्णांनीं भगवद्गीता सांगून त्याचा मोह नाहींसा केला, तसाच भक्तवर्य कै. नानासाहेब चांदोरकरांचा संस्कृताचा अभिमान घालविण्याकरितां शिरडी येथील द्वारकामाईत (मशिदींत)

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे । समवेता युयुत्सवः ॥
मामकः पांडवाश्चैव । किमकुर्वत संजय ॥ १ ॥

## गीतेवरून श्रीकृष्ण व बाबा यांचेमधील साम्य

या श्रीमद्भगवद्गीतेंतील पहिल्या अध्यायांतील पहिल्याच श्लोकांतील पहिल्या ओळींतील दोन शब्द "धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे" यांचा व तिसऱ्या ओळींतील "मामकाः पांडवाश्चैव" यांचा अर्थ विचारून, तसेंच त्याच श्रीमद्भगवद्गीतेंतील

तद्विद्धि प्रणिपातेन । परिप्रश्नेन सेवया ॥
उपदेक्ष्यंति तेज्ञानं । ज्ञानिनस्तत्व दर्शिनः ॥

चवथ्या अध्यायांतील वरील ३४ व्या श्लोकाचा अर्थ विचारून त्यांना कुंठित करून नानासाहेबांना बाबांनीं सर्व गीतेचा व्याकरणांसह बरेच दिवस रोज तास–दीड तास याप्रमाणें अर्थ सांगून त्यांचाही अभिमान नष्ट करून गीतेचें खरें रहस्य किंवा हृद्गत त्यांच्या अंतःकरणावर बिंबविलें. यावरून मशीद ही द्वारका ( किंवा कुरुक्षेत्र ) आहे व बाबा हे कृष्णपरमात्मावतार होते असें ध्वनित होत नाहीं का ?

## बाबांच्या मुखोद्गारांवरून श्रीकृष्ण व बाबांचें साम्य

४ कै. काकासाहेब ( हरि सीताराम, बी. ए. एलएल्. बी., सॉलिसिटर, विलेंपारलें ) दीक्षितांना व कै. नानासाहेब ( नारायण गोविंद चांदोरकर, बी ए. डे. कलेक्टर, कल्याण ) चांदोरकरांना बाबा एकदां म्हणाले कीं, आतां आपण जाऊं ते आठ वर्षांचे होऊन येऊं. श्रीकृष्ण मूर्ति देवकी मातेजवळ प्रथम प्रकटली ती आठच वर्षांची होती. असे वर्णन पुराणांतरीं व इतर ग्रंथांतही आहे.

आठ वर्षांची मूर्ती । असंभाव्य पडिली दीप्ती ॥
तेजें दशदिशा उजळती । तेथें लपती शशिसूर्य ॥ ११६ ॥

श्रीहरिविजय अ. ३

श्रीसाईलीला उपोद्घात वर्ष १ लें अंक १ ला पान २ यावरूनही बाबा कृष्णवतार असे ध्वनित होत नाहीं का ?

५ एकदां बाबा कै. काकासाहेब दीक्षितांना म्हणाले, "काका, मी पूर्वी लोकांना औषध देत असें. पुढें औषध देणें सोडलें आणि हरि हरि करूं लागलों. आणि हरि हरि करतां करतां हरि भेटला" या उद्गारावरून बाबा कृष्णरूप होते असेंच सिद्ध होतें.

## व्यासपूजेवरून श्रीकृष्ण व बाबांचें साम्य

६. बाबांनीं आपली स्वतःची पूजा शके १८३१ ( सन १९०९–१० ) आषाढ शुद्ध १५ च्या दिवशीं आपल्या भक्तजनांकडून शिरडींतील द्वारकामाईत करून घेतली ( याबद्दल साद्यंत वृत्तांत श्रीसाईलीला वर्ष १०, अंक ६, पान तेरा ते एकवीस यांवर पहा ) ही पूजा म्हणजे व्यासपूजा, व ही पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा–कृष्णप्रभूंना जगद्गुरु ही संज्ञा आहे, व व्यासांनाही जगद्गुरु ही संज्ञा आहे. व्यास व कृष्ण हे एक रूपच होते. "व्यासो नारायणः साक्षात्" विष्णु नारायणः कृष्णाः ( अमरकोश )

" मुनीना मप्यहं व्यासः " (श्री. भ. गी. अ. १० श्लो. ३७) व्यासांना कृष्ण ही संज्ञा आहे. तसेंच त्यांचें नांव कृष्ण द्वैपायन आहे. " तमहमरागमकृष्णं कृष्णद्वैपायनं वंदे " (वेणीसंहार नाटक) (एल. आर. वैद्य यांचा संस्कृत इंग्लिश कोश पान २०६ व ८८१) कृष्णाद्विपांत जन्म झाला म्हणून कृष्ण द्वैपायन असें व्यासांना म्हणतात असें महाराष्ट्रीय कोशाचें पान " व " यावर कोशकर्ते डॉक्टर केतकर यांनीं लिहिलें आहे. तथापि वरील चारी उताऱ्यांत व्यासांना जो कृष्ण शब्द लावला आहे तो कृष्णपरमात्मा या अर्थानेंच लावलेला दिसतो. अर्थात बाबांची त्या दिवसाची पूजा म्हणजे कृष्णदर्शक असून द्वारकामाईतील पूजा दक्षिणद्वारकादर्शक आहे असें स्पष्ट दिसतें.

## मंदिरावरून प्रभु मुरलीधर व बाबांचें साम्य

७ नागपूरच्या श्रीमंत बुटीसाहेबांनीं बांधिलेल्या शिरडी येथील दगडी वाड्यांत ज्या जागेवर गोपालकृष्णाचें किंवा मुरलीधराचें मंदिर होणार होतें, त्याच जागेवर बाबांच्याच आज्ञेनें त्यांची पुण्य समाधी बांधण्यांत आली.

निर्याणापूर्वी ४-५ दिवस सोनीचे आईस (अंधू मारवाड्याच्या बायकोस) बोलावून श्रीनीं सांगितलें कीं, आतां मला मशिदीचा कंटाळा आला, त्रावडीचा कंटाळा आला. आतां मी वाड्यांत जाऊन बसेन. तेथें मटे लोक माझा सांभाळ करतील.

तसेंच कै. बापूसाहेब जोगांच्या कुटुंबाना समाधिस्त होण्यापूर्वी ४-५ वर्षांपूर्वीच बाबांनीं त्यांचा हात धरून आणून सांगितलें कीं, ही हगदोडीची जागा माझी आहे. इथें दगडी इमारत होईल. तेथें मी बसेन. वगैरे वगैरे. यावरून बाबा गोपालकृष्ण किंवा मुरलीधर होते व मशीद ही द्वारका होती हें निर्विवाद ठरतें.

श्री साईलीला वर्ष १ लें, अंक ११, पान ७९-८०.

## विटेवरून बाबा व कृष्ण यांच्या मधील साम्य

८ बाबा शिरडींत आल्यापासून त्यांच्याजवळ एक मातीची पक्की भाजलेली वीट होती. तिची ते अत्यंत काळजी घेत व रोज उशाकडे घेऊन निजत. ते मशिदींत आले तेव्हां कै. म्हाळसापती व काशिराम शिंपी तिला स्नान घालीत, तिची पूजा करीत व नीट जपून धुनीच्या खांबाजवळ ठेवीत. रात्रीं तिला कपड्यांत गुंडाळून बाबा उशास घेत. पुढें महादु फसले मशिदीचें काम करूं लागला तोही ती वीट अत्यंत काळजीपूर्वक धुऊन श्रीधुनीमाईचा खांब व हल्लीं बाबांच्या पेटीच्या (कपड्याच्याखालीं असलेली सीमेंटची बैठक यांमधील लहानशा फटींत ठेवी व रात्रीं कपड्यांत गुंडाळून बाबांच्या उशाकडे ठेवी. बाबांचें त्या विटेवर फार प्रेम असे. ते तिला कधींहि विसंबत नसत. ती वीट त्यांची जीव कीं प्राण असे. एक दिवस ती कोणाच्या हातून फुटली व तिचे दोन तुकडे झाले. हें बाबांना कळल्यावर त्यांना अत्यंत वाईट वाटलें. ते कळवळले, त्यांनीं आपलें स्वतःचें डोबाड झोडून घेतलें, रडूं लागले व म्हणाले कीं, माझी संगतीण गेली. मी आतां रहणार नाहीं, वीट फुटल्या दिवसापासून बाबांना बरें वाटेनासें झालें व ते पांचव्या किंवा सहाव्या दिवशींच सामाधिस्त झाले. ती फुटकी वीट महादूनें तशीच त्यांच्या समाधींत त्यांचे

उशाकडे ठेविली आहे असे महादू फसले, माधवराव देशपांडे व तात्या पाटील कोते सांगतात.

यावरून ही वीट भक्तशिरोमणि पुंडलिक यांनीं कृष्णपरमात्मास पंढरी क्षेत्रांत बसावयास दिलेल्या विटेचे व श्रीपांडुरंग ज्या विटेवर उभे आहेत तिचें दर्शक असून बाबा हे विठ्ठल-कृष्ण स्वरूप होते याचें दर्शक आहे असेंच सिद्ध होतें. पांडुरंगांनीं वीट पायांखालीं घेतली व बाबा ती उशाकडे घेत इतकाच फरक, व वस्तुतः तोही फरक नाहीं. कारण कृष्णपरमात्मा मानव-स्वरुपांत-देहांत असतां ते पुंडलिकांनीं दिलेली वीट प्रेमवस्तु म्हणून अशीच अत्यंत काळजीपूर्वक कोठें तरी स्वतःजवळ जतन करून ठेवीत असले पाहिजेत. विठ्ठलरुपी दगडाच्या मूर्तीनें चिरस्थाई स्थिर स्वरूप घेतल्यामुळें तिच्या वाटेलाही तिच्याचप्रमाणें तिच्या पायांखालीं २८ युगें चिरस्थायित्व प्राप्त झालें. बाबांचाही पुढें केव्हां तरी संगमरवरी दगडाचा शेषशाई स्वरूपांत चिरस्थाई पुतळा तयार झाल्यास त्यांच्या उशाकडील विटेलाही चिरस्थायित्व प्राप्त होईल. ही फुटकी वीट हल्लीं समाधींत बाबांच्या उशाकडे महादु फसल्यानें हट्टानें व आग्रहानें ठेविली असल्यामुळें बाबांच्या बरोबर तिलाही चिरस्थायित्व आलें आहे.

पाद घर्षणाची वीट बरी । ते न वेंची निर्धारीं । ती पडली होती भूवरी । बैसावयासी चिरकाळ ॥ १० ॥ तें वीट पुंडलिकें । बैसावया लाविली कौतुकें ॥ ती पायाखालीं लक्ष्मी नायकें । घालोनि इंद्र उद्धरिला ॥ ११ ॥

पां. भ. अ. २.

ह्या विटेच्या योगानें बाबा महादु फसल्याचा उद्धार करतील; नाहीं म्हणून कोणी सांगावें ?

## बाबा व पांडुरंग यांतील साम्य

९ पंढरीस कशास जातां ? पंढरी येथेंच आहे, व ही मशीद ही द्वारकामाई आहे, असें बाबा नेहमीं पंढरीस जाऊं इच्छिणाऱ्या लोकांना सांगत, त्यांना बसल्या ठिकाणींच विठ्ठल स्वरूपांत दर्शन देत, हें सर्वश्रुत आहे. ( श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे वगैरे वगैरे ) या बाबांच्या उद्गारावरून व प्रत्यक्ष कृतीवरून बाबा हे कृष्ण व मशीद ही द्वारका असेंच सिद्ध होतें.

## छत्रचामरें, अबदागिरी, पालखी वगैरे राजैश्वर्य साम्य

१० कै. श्री. राधाकृष्ण आई ह्या कै. नानासाहेब चांदोरकर यांच्याबरोबर पंढरपुराहून शिरडीस सन १९०५-६ च्या सुमारास आल्या. त्यांचें नांव सुंदराबाई क्षीरसागर. त्यांची बाबांवर अत्यंत प्रेमळ भक्ति असून त्यांनीं आपलें तन व मन बाबांना सर्वस्वी अर्पण केलें होतें. ह्यांचे वेळेपासूनच बाबांची आरती होऊं लागली, व आरतीच्या वेळेस अबदागीर, चवऱ्या, छत्रचामरें बाबांवर ढाळूं लागलीं. बाबा चावडींत जातांना वाजत-गाजत घोडा, पालखी, चोपदार, भजनकरी मंडळी, गरुड टके, पताका या इतमामानिशीं जाऊं लागले. चावडी, आरसे, हंड्या, झुंबरें, तसबिरी यांनीं सुशोभित

झाली. यांच्यामुळें रात्रीं बाबांची शेजारती व पहांटे काकडआरती सुरू झाली. ह्या स्वतः बाबांची सेवा करीत व दुसऱ्याकडूनही करवून घेत. यांनीं शिरडीस संस्थानचें स्वरूप आणलें. ह्या शिरडीस फक्त ८–९ वर्षेंच होत्या. व वयाच्या ३५ व्या वर्षीं ह्यांनीं आपला अवतार शिरडीलाच संपविला. पण ह्यांनीं आपल्या आठ वर्षांच्या कारकीर्दींत जें काम केलें; तें एखाद्या साधारण भक्ताला पंचवीस वर्षांत सुद्धां करतां आलें नसतें. या बालविधवा होत्या. बाबा आपले पूर्वजन्मींचे पति असें समजून त्या बाबांची सेवा करीत असत. त्या आपला चेहरा बाबांना कधीं दाखवीत नसत व मशिदीच्या ओट्यावरही कधीं चढत नसत. "बाबा ही त्यांना ही पूर्वी (पूर्वजन्मीं) आपल्या जवळ होती. पण आपण तिला कधीं शिवलों नाहीं असें म्हणत" असें शिरडीचे माधवराव देशपांडे सांगतात. राधाकृष्ण आईजवळ एक लहानशी धातूची गोपालकृष्ण मूर्ती असे. त्या मूर्तीस त्या २४ तास जवळ बाळगीत. शौचाला जातेवेळीं सुद्धां ती मूर्ति त्यांचेजवळ असे. बाबांचा सर्व राजविलासी थाट यांनीं बनविला. या शिरडीस आल्यापासून बाबांच्या फकिरी बाण्याचा देखावा जाऊन त्यास राजयोगाचें स्वरूप प्राप्त झालें. त्या जरी वयानें लहान होत्या, तरी जबरदस्त कर्तृत्ववान होत्या. त्यांची सर्व भक्तजनांवर इतकी छाप होती कीं, त्यांचा शब्द मोडण्यास कोणाची छाती होत नसे. त्यांचा सर्व काळ बाबांच्या सेवेंत व बाबांच्या दिखाऊ राजवैभवांत भर घालण्यांत जाई. त्यांच्या मुखांत निरंतर राधाकृष्ण हें नांव असे व त्यावरूनच त्यांना राधाकृष्ण हें नांव पडलें असावें. ह्या शिरडीस आल्यापासून बाबांना नित्यनेमानें दररोज पांच पानांचे गोविंद विडे व कुटलेले विडे पाठवीत व त्यापैकीं कुटलेला विडा बाबा रोज दुपारच्या जेवणानंतर खात व वर पाणी पीत. तसेंच बाबा एका दिवसाआड जेव्हां चावडींत निजावयास जात, त्या वेळीं सायंकाळीं त्या न्हाऊन फक्त पांच दिवे कंदिलांत ठेवून स्वतः पांढरें पातळ नेसून तोंडावर बुरखा घेऊन तो कंदील मशिदीचे पायरीवर ठेवीत व परत जात. हीं पांढरीं पातळें बाबाच त्यांना घेऊन देत. बाबा त्यांना दररोज एक वेळां दुपारीं आलेल्या भिक्षा व नैवेद्यपैकीं एक भाकरी व थोडीशी भाजी माधवराव देशपांडे यांचे हस्तें पोंचवीत.

## राधाकृष्ण यांच्या शिरडींतील चरित्रावरून कृष्ण व बाबा यांच्यांतील साम्य

श्री गोकुल अष्टमीचा उत्सव, बाबा कृष्ण आहेत अशा भावनेनें शिरडींत बाबांचे मंदिरांत (श्रीद्वारकामाईंत) श्रीराधाकृष्ण आईनींच प्रथम सुरू केला. व त्यांत त्यांनीं पंढरपूरच्या काल्याची प्रथा शिरडींत आणिली. राधाकृष्ण आई पंढरपूराहून शिरडीस आल्या. त्यांचे पूर्वी शिरडींत काला करण्याची चाल नव्हती.

वरील दृश्य, बाबा कृष्ण होते, मशीद द्वारकामाई होती व राधाकृष्णआई ह्यापूर्वी केव्हां तरी व कोणत्यातरी जन्मांत राधा होत्या याचीच साक्ष पटवते. हल्लीं द्वारकेंत जशी राधाकृष्णाची (रुक्मिणी कृष्णाची किंवा रुक्मिणी पांडुरंगाची नव्हे) पूजा होते तशीच

शिरडींतसुद्धां राधाकृष्णआई हयात असेपर्यंत बहुतेक सर्व भक्त संघांत बाबाप्रमाणेंच त्यांचीही सेवा करीत असे. राधाकृष्णआई राधेप्रमाणेंच मोठ्या मानी असत. या कोणी-तरी पूर्वजन्मींच्या योगभ्रष्ट योगिनी असाव्या असें दिसतें.

(श्रीसाईलीला वर्ष १, अंक १, पान १७१)

श्रीहरिविजयांत ८ व्या अध्यायांत जें राधेचें त्रोटक कथानक दिलें आहे, त्यांत व वरील राधाकृष्ण आईचे वर्तनांत बरेचसें साम्य दिसतें.

## गायी पाळण्यावरून कृष्ण व बाबा यांचेमधील साम्य

११. बाबांच्याजवळ गाई, शेळ्या, मोर व बकऱ्या असत. त्या तात्याबा कोते पाटील यांचेकडे असत. तेच त्यांची सर्व व्यवस्था ठेवीत असत, व त्याच गाईंचें व शेळ्यांचें दूध, दहीं, ताक लोणी, बाबा खात.

१२. शिरडीच्या आजूबाजूस फार पूर्वीं पुष्कळ गौळवाडे होते असें तेथील व इतर ठिकाणचे लोक सांगतात. यावरून ही बाबांची भूमिका श्रीकृष्णाचीच होती व मशीद ही द्वारावतीच होती असें दिसतें.

## वनमाला दोघेही अंगावर घालीत म्हणून बाबा व कृष्ण यांत साम्य

१३. बाबांचा बाग शिरडींत तयार होण्यापूर्वी कित्येक भक्त (महाली मर्द नामदेव, सावंत, राहणार कसरवाडी, ता. संगमनेर) बाबांना नेहमीं तरवडाचीं रानटीं फुलें आणून देई व वाही तसेंच निमगांवचे कै. श्री. सीताराम जयराम डेंगळे हे रोज जंगली फुलांची माळ स्वतः करून मुद्दाम दुपारचे वेळीं घेऊन येत व बाबांना घालीत, व बाबा त्या तरवडाच्या फुलांचा व त्या माळेचा आनंदानें स्वीकार करीत. कृष्ण परमात्म्याचे संवगडीही कृष्ण परमात्मास जंगली फुलांच्याच माळा घालीत.

## दोघेही हातांत काठी घेत म्हणून श्रीकृष्ण व बाबा यांत साम्य

१४. कृष्ण परमात्माचे हातांत एक काठी असे. बाबाही हातांत सटके [ दांडकी, काठ्या, ] ठेवीत.

'जानूमध्यें धारिली काठी। सुहास्य वदन जगजेठी। वनमाला रुळती कंठी। चरणां-गुष्टपर्यंत ॥ ८१ ॥ पां. म. अ. २.

या वरील वर्णन सादृश्यावरून बाबा हे कृष्ण परमात्मा होते असेंच सिद्ध होतें.

## —काला—

बाबा शिरडींत आल्यावर प्रथम कधीं कधीं नानाप्रकारचे निरनिराळे पदार्थ आणून स्वतः हंडी तयार करीत. कधीं लहान व कधीं मोठी हंडी तयार करीत. द्वारकामाईचे अंगणांत चूल घालून मसाला स्वतः वाटून तो हंडींत इतर पदार्थांबरोबर घालून शिजवून सर्वांस (ज्यांची इच्छा असेल त्यांस देत) देत. हीच काल्याची सुरवात. (श्रीसाईसच्चरित्र अ. ३८ सविस्तर वर्णन पहावें.)

## दोघेही काला करीत म्हणून कृष्ण व बाबा यांच्यांत साम्य

नंतर श्री राधाकृष्ण आई शिरडींत आल्यापासून भक्तजनांकडून पुष्कळ नैवेद्य बाबांकडे येऊं लागले. दुपारची आरति झाल्यावर माधवराव देशपांडे यांच्या विनंतीवरून बाबा आपल्या नेहमींच्या आसनांवरून उठून फुलांचे शेरे व माळा घातलेल्या अल्लामियाच्या कमानीजवळ असलेल्या निंबरास पाठ लावून येऊन बसत, व आलेल्या नैवेद्यांतील भातांत भात, भाजींत भाजी, कढींत कढी, ताकांत ताक, दुधांत दूध, दह्यांत दही, शिऱ्यांत शिरा, याप्रमाणें पदार्थ एकांत एक मिसळून, त्या सर्वांचा काला करून त्यांतच आपण मागून आणलेले भिक्षेचे पदार्थ घालून आपल्याभोवतीं वर्तुळाकार बसलेल्या सर्व गोपगणांस वाटून देत.

हें दृश्य खालीं वर्णिलेल्या दृश्यासारखेंच आहे.

यमुना पावळीं । गाडियां बोले वनमाळी । आणा शिदोऱ्या सकळीं । काला करूं आजी । अवघे एक ठायीं । करुनि स्वाद त्याचा पाही । मजपाशी आहे तेंही । तुम्हां माजी देतों ॥ १ ॥ म्हणती बरवे गोपाळ । म्हणती बरवे गोपाळ । वाहती सकळ । मोहरी पांवे आनंदें । खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा । काला करुनियां वांटा । गडियां देतो हरी ॥ २ ॥ घ्यारे भोंकरें भाकरी । दहिं भाताची शिदोरी ॥

श्रीतुकाराम गाथा अभंग १७२ व १७७.

### काला

वेणु नादीं श्रीहरें । काला वाटिला स्वकरें
वामानिं बैसुनी एकसरें । देव तेथें पाहती ॥ २४ ॥
कमलाकार गोपाळ । मध्यें भ्रमर तमालनील ।
निधाना भोंवतें साधक सकळ । साधाया जेविं बैसले ॥ २५ ॥
आपुला शिदोऱ्या संपूर्ण । हरीपुढें ठेवीती आणून ॥ २९ ॥

पांडुरंग माहात्म्य अ. १०.

यावरूनही बाबा कृष्णावतार होते हेंच सिद्ध होतें.

**वेणुनादः**—भीमरथीचे वाळवंटांत असलेल्या विष्णुपद तीर्थास वेणुनाद म्हणतात.

### उपसंहार

"चंद्र तेथें चंद्रिका, शंभु तेथें अंबिका" या श्री ज्ञानेश्वरींतील १८ व्या अध्यायांतील शेवटच्या श्लोकावरील भाष्यांत लिहिलेल्या दृष्टांताप्रमाणें "कृष्ण तेथें द्वारका" असलीच पाहिजे. ही दोहोंची सांगड अविभेद्य समवायी आहे. या लेख पूर्वार्धांतील संतौक्तिक, पौराणिक, भौगोलिक, भूगर्भशास्त्रीय, दंतकथिक, व प्रात्यक्षिक उपलब्ध माहितिवरून असें दिसतें कीं, आजपर्यंत ( जगाच्या प्रारंभापासून ) कितीही कृष्णावतार झाले असले तरी आपल्यास फक्त तीनच कृष्णावतारांची म्हणजे तीनच द्वारका नगरींची माहिती मिळते. कृष्ण परमात्मा निजधामास गेले त्यावेळीं बुडविलेली किं

परमात्मा, रुष्ट रुक्मिणीमाईची समजूत करण्याकरतां दक्षिणेंत दिंडीरवनांत आले तेव्हां त्यांच्या सर्व सोळा हजार स्त्रिया परमात्मांचा शोध करण्याकरतां दिंडिरवनांत—पंढरीस—आल्या तेव्हां त्यांचे मार्गे समुद्रांत बुडविलेली द्वारका पहिली होय. श्रीपुंडलीकांच्या वराप्रमाणें बुडविलेल्या द्वारकेची सर्व संपत्ति व इतर सर्व परिवार आणून दिंडिरवनांत निर्माण केलेली दुसरी द्वारका (हल्लींचें पंढरपूर) व नंतर ऋषिमंडळींच्या विनंतीवरून समुद्रापासून १२ योजनें जागा मागून घेऊन निर्माण केलेली हल्लींची काठेवाडांत असलेली तिसरी पश्चिम द्वारका.

पंढरपूर क्षेत्र मंडळांत शिरडी येते. म्हणून शिरडी ही फार फार पुरातन काळीं द्वारका—दक्षिण द्वारका होती किंवा दाक्षिण द्वारकेचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता असें अनुमान निघतें.

या लेखाच्या उत्तरार्धांतील बाबांच्या उपलब्ध असलेल्या अल्प चरित्रावरून व कृष्ण चरित्राला जुळणाऱ्या विविध प्रकारच्या लीलांवरून बाबा हे कृष्ण होते असें खात्री-शीर अनुमान निघतें. व बाबा मशिदीस द्वारका कां म्हणत व उशाशीं वीट घेऊन कां निजत, या गोष्टींचाही चांगलाच उलगडा होतो, व बाबांची उक्ति सत्य कशी यावरही चांगला प्रकाश पडतो, असें माझ्या अल्प समजुतीस वाटतें.

बाबा शिरडींत आल्या दिवसापासून एक दिवसाआड द्वारकामाईतून चावडींत निजावयास कां जात असत याबद्दल अद्याप कांहीं खुलासा होत नाहीं. असो. तोही त्यांच्याच कृपेनें व प्रेरणेनें पुढेंमागें होईल.

आतांपर्यंत यथामति मिळविलेल्या संशोधन सामग्रीवरून शिरडी ही द्वारका व बाबा हे कृष्ण अशी खात्री होते. तथापि तिला शिरडींत प्रत्यक्ष कांहीं ठिकाणीं उत्खनन केल्याशिवाय सिद्धांतस्वरूप येणार नाहीं याची मला पूर्ण जाणीव आहे. शक्यतों प्रयत्न केला आहे. तज्ञांनीं याचा अंतःकरणपूर्वक विचार व मनन करून या कार्यास शक्य ती मदत करून आपल्या ज्ञानाचा लाभ मला देऊन मला प्रोत्साहन द्यावें व दिशा दाखवावी, अशी माझी वाचकवृंदास अति नम्र विज्ञप्ति आहे. शेवटीं झालेली वाङ्मयकुसुमांजली अनन्य भक्तिप्रेमानें प्रथम श्रीदत्तगुरु साईबाबांचें पुण्यचरणीं अर्पण करून नंतर जनी जनार्दनसही समर्पण करून हा छोटासा लेख संपवितों.

या संशोदन कामीं ठिकठिकाणीं जे नकाशे दिले आहेत ते श्री. मोहनीराज बालाजी औटी, शाळामास्तर हेरदाळें, ता. कोपरगांव यांनीं तयार केले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

ठाणें, गुरुवार<br>
मिति पा. शु. ९<br>
शके १८५९ ता. १०–३–३८

श्रीसाईपदरज दासानुदास<br>
**बा. वि. देव**<br>
बाबांचें बाळ.

|| ॐ श्रीसाईनाथाय नमः ||

# —ः श्री साईबाबा अष्टोत्तर नामावली ः—

१ ॐ श्री साईनाथाय नमः
२ ,, लक्ष्मीनारायणाय नमः
३ ,, कृष्णारामशिवमारुत्यादिरुपाय नमः
४ ,, शेषशायिने नमः
५ ,, गोदावरीतटशीलधीवासिने नमः
६ ,, भक्तहृदालयाय नमः
७ ,, सर्वहृन्निलयाय नमः
८ ,, भूतावासाय नमः
९ ,, भूतभविष्यद्भाववर्जिताय नमः
१० ,, कालातीताय नमः
११ ,, कालाय नमः
१२ ,, कालकालाय नमः
१३ ,, कालदर्पदमनाय नमः
१४ ,, मृत्युञ्जयाय नमः
१५ ,, अमर्त्याय नमः
१६ ,, मर्त्याभयप्रदाय नमः
१७ ,, जीवाधाराय नमः
१८ ,, सर्वाधाराय नमः
१९ ,, भक्तावनसमर्थाय नमः
२० ,, भक्तावनप्रतिज्ञाय नमः
२१ ,, अन्नवस्त्रदाय नमः
२२ ,, आरोग्यक्षेमदाय नमः
२३ ,, धनमाङ्गल्यप्रदाय नमः
२४ ,, ऋद्धिसिद्धिदाय नमः
२५ ,, पुत्रमित्रकलत्रबन्धुदाय नमः
२६ ,, योगक्षेम वहाय नमः
२७ ,, आपद्बान्धवाय नमः
२८ ,, मार्गबन्धवे नमः
२९ ,, भक्तिमुक्ति स्वर्गापवर्गदाय नमः
३० ,, प्रियाय नमः
३१ ,, प्रीतिवर्धनाय नमः
३२ ,, अन्तर्यामिणे नमः
३३ ,, सच्चिदात्मने नमः
३४ ,, नित्यानन्दाय नमः
३५ ,, परमसुखदाय नमः
३६ ,, परमेश्वराय नमः
३७ ,, परब्रह्मणे नमः
३८ ,, परमात्मने नमः
३९ ,, ज्ञानस्वरूपिणे नमः
४० ,, जगतःपित्रे नमः
४१ ,, भक्तानां मातृधातृपितामहाय नमः
४२ ,, भक्ताभयप्रदाय नमः
४३ ,, भक्तपराधीनाय नमः
४४ ,, भक्तानुग्रहकातराय नमः
४५ ,, शरणागत वत्सलाय नमः
४६ ,, भक्तिशक्तिप्रदाय नमः
४७ ,, ज्ञानवैराग्यदाय नमः
४८ ,, प्रेमप्रदाय नमः
४९ ,, संशयहृदयदौर्बल्यपापकर्मवासनाक्षयकराय नमः
५० ,, हृदय ग्रन्थिभेदकाय नमः
५१ ,, कर्मध्वंसिने नमः
५२ ,, शुद्धसत्वस्थिताय नमः
५३ ,, गुणातीतगुणात्मने नमः
५४ ,, अनन्तकल्याणगुणाय नमः
५५ ,, अमितपराक्रमाय नमः

५६ ,, जयिने नमः
५७ ,, दुर्धर्षाक्षोभ्याय नम
५८ ,, अपराजिताय नमः
५९ ,, त्रिलोकेषुअविघातगतये नमः
६० ,, अशक्यरहिताय नमः
६१ ,, सर्वशक्तिमूर्तये नमः
६२ ,, स्वरूपसुन्दराय नमः
६३ ,, सुलोचनाय नमः
६४ ,, बहुरुपविश्वमूर्तये नमः
६५ ,, अरूपाव्यक्ताय नमः
६६ ,, अचिन्त्याय नमः
६७ ,, सूक्ष्माय नमः
६८ ,, सर्वांतर्यामिणे नमः
६९ ॐ मनोवागतीताय नमः
७० ,, प्रेममूर्तये नमः
७१ ,, सुलभदुर्लभाय नमः
७२ ,, असहायसहायाय नमः
७३ ,, अनाथनाथदीन बन्धवे नमः
७४ ,, सर्वभारभृते नमः
७५ ,, अकर्मानेककर्मसुकर्मिणे नमः
७६ ,, पुण्यश्रवण कीर्तनाय नमः
७७ ,, तीर्थाय नमः
७८ ,, वासुदेवाय नमः
७९ ,, सतांगतये नमः
८० ,, सत्परायणाय नमः
८१ ,, लोकनाथाय नमः
८२ ,, पावनानघाय नमः
८३ ,, अमृतांशवे नमः
८४ ,, भास्कर प्रभाय नमः
८५ ,, ब्रह्मचर्य तपश्चर्यादिसुव्रताय नमः
८६ ,, सत्यधर्म परायणाय नमः
८७ ,, सिद्धेश्वराय नमः
८८ ,, सिद्धसंकल्पाय नमः
८९ ,, योगेश्वराय नमः
९० ,, भगवते नमः
९१ ,, भक्तवत्सलाय नमः
९२ ,, सत्पुरुषाय नमः
९३ ,, पुरुषोत्तमाय नमः
९४ ,, सत्यतत्वबोधकाय नमः
९५ ,, कामादिषड्वैरिध्वंसिने नमः
९६ ,, अभेदानन्दानुभव प्रदाय नमः
९७ ,, समसर्वमतसंमताय नमः
९८ ,, श्रीदक्षिणामूर्तये नमः
९९ ,, श्रीवेङ्कटेशरमणाय नमः
१०० ,, अद्भुतानन्दचर्याय नमः
१०१ ,, प्रपन्नार्तिहराय नमः
१०२ ॐ संसारसर्वदुःखक्षयकराय नमः
१०३ ,, सर्ववित्सर्वतोमुखाय नमः
१०४ ,, सर्वान्तर्बहिःस्थिताय नमः
१०५ ,, सर्वमंगल कराय नमः
१०६ ,, सर्वाभीष्टप्रदाय नमः
१०७ ,, समरससन्मार्ग स्थापनाय नमः
१०८ ,, श्रीसमर्थ सद्गुरु साईनाथाय नमः

# शिरडी ( शैलधी )

## लेंडीबाग

**शिरडी** हा गांव अहमदनगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत आहे. त्या शिरडी गांवाला 'श्री सद्‌गुरु साईनाथ बाबा' यांच्या सहवासानें महत्त्व आलें. आजमितीस **शिरडी** हें महान् क्षेत्र झालें आहे; कारण तेथें पांच तीर्थांचा समुदाय झाला आहे.

( १ ) तपोवन–( लेंडीबाग )
( २ ) बाबांच्या गुरुरायांची समाधी व निंबवृक्ष
( ३ ) बाबांचें समाधीमंदिर
( ४ ) बाबाची द्वारकामाई
( ५ ) बाबांची चावडी ( एक दिवसाआड निजण्याची जागा )

( १ ) **तपोवन**—हें तापसांचें धन आहे. त्या ठिकाणीं असणारा अश्वत्थ वृक्ष व जवळ सदैव प्रकाश देणारा नंदादीप व त्यालाच कै. यशवंतराव जनार्दन गाळवणकर यांनीं बांधलेला पार व श्रीबाबांचा फोटो म्हणजे गाणगापूर क्षेत्रच, कारण तपोवनांनजीक मंदवाहिनी श्री गौतमी ( लेंडी ) असून तपोवनांतच पुष्करिणी ( श्रींनीं स्वतः बांधलेली विहीर ) आहे, तसेंच, अश्वत्थ वृक्षासमोरच, असणारी श्रीबाबांच्या आवडत्या शामसुंदर घोड्याची समाधी आहे. ह्या तपोवनांत ( बागेंत ) आंबे, तरवड, पिंपळ, पारिजातक, रामफळ, उंबर व निंब हीं झाडें अतिशुद्ध व स्वर्गीय असे कल्पवृक्षच आहेत.

**अम्र** ( आंबे ) यांतील 'अ' हा पहिला 'अ'कार.
**अंबुर** ( तरवड ) हा दुसरा 'अ'कार.
**अरिष्ट** ( निंब, लींब ) हा तिसरा 'अ'कार.
**अश्वत्थ** ( पिंपळ ) हा चौथा 'अ'कार.
**औदुंबर** ( उंबर ) हा पांचवा 'अ'कार.

याप्रमाणें पांच दिव्य 'अ'कार आहेत. ह्या तपोवनांत, ब्रह्मा, विष्णु, शंकर व ॐकार स्वरूप गणपती श्रीसद्‌गुरु साईबाबा मानवदेह धारण करूनच आलेले आहेत.

अंबुरांतील 'अ'कार म्हणजे विष्णु.
औदुंबरांतील ( उदुंबर ) 'उ'कार म्हणजे शंकर.
मालकतरु ( निंबवृक्ष ) 'म'कार म्हणजे ब्रह्मदेव.
आम्रतरुंतील 'अ'कार म्हणजे अर्ध मात्रा.

बोधिद्रुमांतील ( अश्वत्थ, पिंपळ वृक्षांतील ) 'ब'कार म्हणजे अर्धमात्रेवर असलेला ब्रह्मकालरूप बिंदुरूप कृष्णपरमात्मा याप्रमाणें अकार, उकार, मकार, अर्धमात्रा व बिंदु मिळून ॐकार रूपानें श्रीसाईबाबा, ॐकारस्वरूप श्रीगणपतीरूपानें सदैव वास करीत आहेत.

त्या बागेंत बाबांनीं मुमुक्षुजनांना तहान भागण्याकरतां व विश्रांति स्थान (सबुरी) घेण्याकरितां, ज्ञानवापि नांवाची विहीर बांधली आहे. तसेंच, गौतमी (जुनी लेंडी नांवाची प्रसिद्ध नदी, नाला) या जमनीचे दोन भाग करून वाहात आहे. ह्या नाल्यांत बाबा प्रत्येक दिवशीं लेंडीवर आल्यावर चांदीचीं नाणीं फेंकून देत असत. गुरु गोविंदला नांदेडला एका गृहस्थानीं एक दिव्य हिरा दिला कीं ज्याची किंमत करतां येणार नाहीं. तो गुरु गोविंदजीनें हातांत घेतला व गोदावरींच्या पात्रांत (गौतमीच्या पात्रांत) फेंकून दिला. त्या गृहस्थाला फार वाईट वाटलें व त्यांनीं विचारलें, 'महाराज, आपण बहुमोलाचा हिरा गंगेंत फेंकलांत याचें कारण काय?' महाराज म्हणाले, 'मला फकिराला त्याची काय किंमत? म्हणूनच माझ्या मातोश्रीस दिला. माझ्या मातोश्रीच्या ठिकाणीं कितीतरी असले हिरे आहेत. बुडी मारून पहा. त्याप्रमाणें त्यानें केलें तों एक ओंजळीभरून त्यासारखेच हिरे बाहेर काढले. गुरुगोविंदजी म्हणाले, 'आतां ओळख पाहूं तुझा कोणता हिरा तो?' तसेंच बाबासुद्धां गौतमीला चांदीचीं नाणीं देत. बाबा स्वतः तरडाचीं व लिंबाचीं झाडें लावीत असत व स्वतः त्यांना पाणी घालीत.

एकदां याच ठिकाणीं ह्या लहानग्या नाल्याच्या पात्रांत पसरलेल्या वेलीच्या कमानीच्या एका लहानशा खांबात खरोखरच खुवीर पुरंदरेंचें मन पहाण्याकरतां बाबांनीं पुरंदरे काकांना अत्यंत विलक्षण डोळे दिपविणारीं, अत्यंत तेजस्वी प्रकाशणारीं, अत्यंत जड अशीं शुद्ध सोन्याचीं तीन वेटोळीं दाखविलीं.

ह्याच तपोवनांत श्री सद्गुरु बाबा देव नदी कालिंदी (लेंडी नाला) पासून जवळच असणाऱ्या पिंपळाच्या (अश्वत्थ) झाडाच्या बुंध्याशीं बसत असत.

हें तपोवन खरोखरच आल्हादकारक आहे, हें बाबांच्या शुद्ध पदधुलीनें मंगल झालें आहे. कोकीळ, साळुंकी व मुंगूस वगैरेंनीं व त्यांच्या मधुर आवाजानें दुमदुमत आहे. संस्थान कमिटीनें खास व्यवस्था करून नानाप्रकारचीं फळें व फूलझाडें लाविलीं आहेत तसेंच मोठी विहीर बांधून त्यांतील पाणी नळांनीं जवळच बांधलेल्या हौदांत सोडलें आहे व तेथून भक्तांकरितां जी स्नानगृहें बांधलीं आहेत त्यांत तें आणून सोडलें आहे.

हें बाबांचें तपोवन म्हणजे खरोखरच नील रत्न आहे. हल्लींची जी प्रधानबाग आहे तेंच बाबांचें तपोवन होय.

एकदां एका गुरुवारीं बाबा लेंडीवरून परत येऊन थोडासा वेळ झाला असेल नसेल तोंच, बाबांनीं मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांना हाताला धरून "भाऊ, चाल मज सांगाती" असें म्हणून भर दोन प्रहरीं लेंडीवर घेऊन गेले व वटवृक्षाखालीं उभे राहिले, बाबांनीं खिशांत हात घातला व दाणे काढून प्रधानांच्या हातांत दिले व म्हणाले, "हे घे. व तुवांच हे दाणें ह्या जागेवर फेंक" व स्वतः टमरेलांतून थोडें पाणी आणून वर शिंपडूं लागले. बाबाची महती गांवोगांव पसरली व बाबांची वाजत गाजत मंडळींसह लेंडीवर फेरी होऊं लागली.

बाबा एके दिवशीं बापुसाहेब बुटींना म्हणाले कीं, "बापुसाब आपले परधानचे मंडळीस तुझ्या वाड्यांतल्या दक्षिण भागच्या खोल्या दे" त्या दिवशीं प्रधान मंडळींसह आले व ते आल्यावर बाबा लेंडीस जाण्यास निघाले. लेंडीवर गेल्यावर "परधान इकडे ये" व त्यांच्या खांद्यावर उजवा हात ठेवून आज्ञा केली, "लेकरांबाळांना घेऊन येऊन मला ही भेटली" व स्वतः बाबांनीं लहान मोठ्या मंडळींकडून व स्वतः हातभार लावून एक एक दगड उचलून तेथें एक विहीर बांधली. त्या विहिरीचें एक महातीर्थ झालें आहे, कारण त्या पाण्याच्या रोगनाशक महतीनें पुष्कळसे रोगी बरे झाले आहेत. ही बाग, प्रधानांनीं मूळ मालकाकडून विकत घेऊन संस्थानला दिली म्हणून तिचें नांव 'प्रधान-बाग' असें ठेवलें.

---

# -: शिर्डीवृत्त :-

माहे सप्टेंबर व ऑक्टोबर १९४९

या दोन महिन्यांत श्री साईबाबांचे दर्शनास बाहेरगांवचे भक्त नेहमींप्रमाणेंच आले होते. ऑक्टोबरमध्यें श्रींचा पुण्यतिथि उत्सव असल्यानें फारच गर्दी झाली होती. सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्यांत भक्तांकडून अनुक्रमें १४ व ३२ देणगी दाखल निरनिराळ्या वस्तू आल्या. त्यांत गलेफांची संख्या जास्त आहे. शिवाय श्री. पी. के. चौधरी येवला यांनीं एक ऑफिस करतां घड्याळ देणगी दिली आहे व श्री. टी. बी. डी. अय्यर यांनीं सुमारें २ तोळे वजनाची ( १ तोळा ११ मासे ५॥ गुंजा वजनाची ) सोन्याची सांखळी दिली आहे.

**धर्मकृत्यः**—लघुरुद्र, अभिषेक, पूजा आरती, ब्राह्मण सुवासिनी भोजन वगैरे नेहमींप्रमाणें झालें. तसेंच सप्टेंबर महिन्यांत श्रीसमाधी मंदिरांत एक सत्यनारायणाची पूजा व आक्टोबर महिन्यांत सहा पूजा झाल्या.

## कीर्तन

**सप्टेंबरः**—संस्थान गवई यांचीं दोन कीर्तनें झालीं व बाहेर गांवचे कीर्तनकार ह. भ. प. विश्वनाथ उर्फ नाथ बुवा पंढरपूर, ह. भ. प. विश्वनाथ बुवा शाळेकर व ह. भ. प. वामनबुवा खंडाळेकर यांनीं श्रीपुढें कीर्तनांची हजेरी दिली.

**आक्टोबरः**—संस्थान गवई यांचीं या महिन्यांत चार कीर्तनें झालीं व कोजागरीचे दिवशीं कुर्ल्याचे श्री. डॉ. गव्हाणकर यांनीं सुश्राव्य कीर्तन केलें.

## नवल विशेष—

श्री. उगावर प्रसाद दीक्षित साकोरी यांनीं श्रीपुढें संगीत भजन केलें. श्री. राजाराम देशपांडे यांनीं हार्मोनियम वादन, रामभाऊ चितळीकर यांनीं पखवाज वादन,

दामुअण्णा बेलापूरकर यांनीं सनईवादन, रंगनाथ शिंपी यांनीं तबला वादन, पंडित जगन्नाथ बुवा सुरतकर यांनीं गायन व हरि शिंपी यांनीं भजन यांची हजेरी श्रीपुढें दिली.

श्री. श्रीमतीबाई नार्वेकर व श्री. शालिनीबाई नार्वेकर यांनीं श्रीपुढें गायनाची हजेरी दिली.

शिरडीचें हवापाणी उत्तम आहे.

## नोव्हेंबर १९४९

चालू महिन्यांत बाहेर गांवचे साईभक्त श्रींचे दर्शनास नेहमींप्रमाणें आले होते.

## धर्मकृत्य

दोन साई भक्तांनी श्री सत्यसाईनारायण पूजा घातल्या. संस्थान गवई यांचीं तीन कीर्तनें कार्तिक शु ॥ ११ व कार्तिक व ॥ ११ व श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथीनिमित्त अशी झालीं. कार्तिक शु ॥ ११ ला समाधीला स्नान वगैरे घालण्यांत आलें. रात्रीं गांवांतून पालखीची मिरवणूक निघाली. समाधी मंदिरांत श्री सिद्धेश्वरीबाई बनारस यांचें सुंदर संगीत भजन झालें. श्री. मेनका शिरोडकर यांनींही गायनाची हजेरी दिली. श्री. वसंत फातरफेकर, श्री सखाराम पंत व श्री. एकनाथ चव्हाण, श्री. नंद गोकुलाल वगैरे मंडळींनीं तबला, फिडल, वगैरे वाद्यांची गाण्याला उत्तम साथ दिली.

श्री गोपालस्वामी श्रीसाईनाथ भजनी क्लबचे चालक सिकंदराबाद यांनीं श्रीपुढें भजन व श्री उमाप्रसाद, लखनौ–भजन तसेंच यशवंत गणपत भोंसले यांनीं नकला केल्या. लक्ष्मण कऱ्हाडकर–भजन, श्री आपटे मु. करंजा संगीत ( गायकी ) भजन–प्रत्येकी १ रुपया व श्रीफळ प्रसाद देण्यांत आला.

## नवल विशेष

श्री लक्ष्मीशंकर उर्फ दाजीसाहेब रासने ( पुणें ) यांनीं गुरूपादुकाजवळील निंबवृक्षाच्या सन्निद्ध असलेल्या श्री. शिवालिंगास चातुर्मास प्रीत्यर्थ चार महिने लक्ष बिल्वदल वाहिले व रुद्राभिषेक केला. समाप्तीच्या दिवशीं रुद्रस्वाहाःकार यज्ञ केला. उत्सव सोहळा ३ दिवस ता. ७–८–९ चालला होता. विद्वान ब्राह्मणांकडून होमहवन केलें ( नगर ). श्री. रासने यांनीं याप्रित्यर्थ संस्थानच्या सर्व नोकरांस व सेवेकऱ्यांस देणग्या दिल्या, चांदीच्या ( शंकराचा ) सुंदर मुखवटा, चांदीची बिल्वपत्रें चांदीच्या दुर्वा, जरीचीं वस्त्रें वगैरे वस्तु श्री. सांईचरणी अर्पण केल्या. एकंदरींत होमहवन वगैरे फार आनंदांत पार पडला.

---

# ' पुण्यतिथी उत्सव ' शिर्डी

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथबाबा महाराज शिर्डी यांचा ३१ वा पुण्यतिथी उत्सव शिरडी येथील समाधीमंदिरांत मि॥ आश्विन शु॥ १० शके १८७१, ता. १–१०–४९ पासून सुरू होऊन ता. ३–१०–४९ रोजीं समाप्त झाला.

उत्सवाला चालू सालीं बाहेरगांवचा पुष्कळ भक्तगण आला होता. सर्व भक्तांची उतरण्याची सोय संस्थान कमिटीनें चांगल्याप्रकारें केली असल्यामुळें, आंघोळीची, रहाण्याची व दर्शनाची व्यवस्था बिनबोभाट, भक्तगणांस कोणताही त्रास न होतां झाली. सरकारच्या नियमाप्रमाणें भोजनाची सोय मात्र करतां आली नाहीं तरी वेळींच आमंत्रण पत्रिकेंत तसें कळविलें असल्यामुळें सर्व भक्तगणांनीं जेवणाची व्यवस्था आपआपली केली होती. भक्तगणानें संस्थानकमिटीला आपुलकीची भावना दाखविली त्याबद्दल कमिटी त्यांची फार ऋणी आहे.

नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त जमलेल्या सर्व भक्तगणांनीं ' श्रीस ' मंगलस्नान घातलें. स्नान घालतांना सर्व मंदिर व सभामंडप भक्तांनीं फुलून गेला होता. जणूं काय महासागर आज ' श्री ' ला स्नान घालण्याकरतां आला आहे असें वाटत होतें. त्यांत दुतर्फा रांगा लावून प्रत्येक वेळेस पांच पांच भक्त वरती समाधीवर स्नान घालण्यास सोडत असल्यामुळें व पांच पांच स्त्री भक्तांना तसेंच रांगेनें सोडत असल्यामुळें गंगा, यमुना, गोदावरी, चंद्रभागा व भीमा जणूं काय बाबांना स्नान घालण्यास आल्या आहेत असें वाटे. त्यांत चौघडा व सनईचा मंजूळ स्वर व समाधीवर फुलांचा वर्षाव, व पंचामृताच्या पाटांचे ओघळ पाहून त्यांत त्या आरतीचा थाट पाहून जणूं काय आपण स्वर्गांत आहोंत असा परमानंदाचा लाभ भोगण्यास मिळत होता. संध्याकाळीं कीर्तन झालें व रात्रौ गांवांतील मंडळीनें बसविलेला ' दारुबंदी ' या नाटकाचा प्रयोग फारच प्रेक्षणीय व मनावर परिणामकारक झाला. नंतर रेडियोस्टार दीक्षित यांचें गायन व श्री. राजाराम देशपांडे ( पुणें ), यांचें हार्मोनियम वादन झालें व नंतर श्रींची भव्य मूर्ति ( तसबीर ) पालखींत ठेवून तिची गांवांत, ताशे, चौघडा, भजन व दारुकाम वगैरे वगैरेंच्या थाटांत काढून समाधीमंदिरांत आणली.

दुसरे दिवशीं, ता. २–१०–४९ रविवार रोजीं भिक्षा व समाधीस भक्तगणांनीं मंगलस्नान घातल्यानंतर, समाधीसमोर, कीर्तन ( श्रीसाईचरित्रावर ) झालें. सायंकाळीं, पत्रिकेंत जाहीर केल्याप्रमाणें श्रीच्या जुन्या कपडयांचा लिलाव झाला. रात्रौ रथाची गांवांतून मिरवणूक निघाली व रथापुढें दीक्षितवाडयासमोर गारुड झालें.

( गारूडः—ळळीतासारखा प्रकार ) त्यांत संस्थानच्या नोकर वर्गानें भाग घेतला होता, व तो इतका प्रेक्षणीय झाला कीं मुंबईच्या नाटक कंपन्यांत नांवाजलेले पार्टी फिके पडतील. खेडेगांवांत शिक्षण नसतांना, बहुरुप्याची, गारुड्याची, दळण्याची,

संतांचे अभंग म्हणून त्याप्रमाणें कृति करून हुबेहुब नक्कल करणें व त्याचा परिणाम दुसऱ्यांच्या मनावर करून देणें म्हणजे कांहीं साधी गोष्ट नव्हे. नंतर रथांतील तसबीर समाधीवर आरूढ झाली व सभामंडपात संवत्सर शाळेंतील विद्यार्थ्यांनी बसविलेला "सिंहाचा छावा" हें नाटक, नकलांसह करून दाखविण्यांत आलें. नंतर बेलापूर येथील दामुअण्णा सनईवाले यांचें गोड सुस्वर सनई--वादन झालें व संस्थानचे सन्मानीय सभासद व विश्वस्त नानासाहेब रासने यांनीं आपल्या खडया सुस्वर आवाजांत श्री साईबाबावर रचलेल्या कवाल्या म्हणून सर्व समाधीमंदिर दुमदुमून सोडलें. अशा प्रकारें सर्व रात्र 'देव निजला असेल तरी करावा जागा' या वाक्याप्रमाणे श्रीसाईबाबांस झोपण्यास सवडच दिली नाहीं व श्रीसुद्धां आपल्या भक्तांचें कोड पुरवीत होते.

तिसरे दिवशीं ता. ३-१०-४९ रोजीं काला कीर्तन होऊन दहीं-हंडी झाली व उत्सव समाप्त झाला. पुण्यतिथी उत्सवाला बहुतेक सर्व संस्थान कमिटीचे सभासद हजर होते, फक्त डॉ. के. भ. गव्हाणकर यांच्या घरीं पुण्यतिथी उत्सव असल्यामुळें येऊं शकले नाहींत, परंतु ते कोजागरी पौर्णिमेला जातीनें हजर राहून उत्सव साजरा केला. कोजागरीनिमित्त श्रीवर अभिषेक झाला व डॉ. गव्हाणकर यांनीं कीर्तन केलें. नंतर १२ वाजतां चंद्राची पूजा करून सर्व भक्तमंडळींस दुधाचा प्रसाद देण्यांत आला. दिवाळीला दिपोत्सव, दारुसामान लावून व स्थानिक विश्वस्थ श्री. बाजीराव पाटील यांचे हस्तें लक्ष्मीपूजन झालें व सर्व नोकर वर्गास दिवाळीचा फराळ (फळें वगैरे) देण्यांत आला. अशा रीतीनें दसऱ्यापासून तो थेट दिवाळीपर्यंत शिरडी 'दुमदुमली पंढरी' अशी झाली.

**सेक्रेटरी**

**सूचनाः**—सगुणोपासनेंतील आडकर यांची आरती सिद्ध झाली आहे. कारण श्रीसाईबाबांनीं स्वतः ती आरती लिहून भक्त नानासाहेब चांदोरकरांस पाठविली होती. ती आरती श्रींसमोर नेहमीं म्हटली जात असे व अजूनही म्हटली जाते. तरी सर्व भक्तजनांनीं तीच नित्योपासनेंत म्हणावी.

—**संपादक**

---

## --शिरडी संस्थानचे ट्रस्टीज्—

**(आजन्म)**


१) श्री. नागेशराव आत्माराम सावंत, मुंबई
२) ,, बाजीराव तात्या कोते पाटील, शिरडी
३) ,, दत्तात्रय दामोदर रासने, पुणें
४) ,, श्रीपाद बाळकृष्ण देव, ठाणें

## —:संस्थान कमिटीचे सभासद:—

चालू सालीं पुढील ३ वर्षांकरतां (सन १९४९ ते १९५२ करतां) खालील सभासदांस भक्तमंडळानें निवडून दिलें आहे.

(१) **अध्यक्ष:**—श्री. पी. के. सावंत M. L. A., B. A.; LL. B.; मुंबई
(२) **सेक्रेटरी:**—श्री. दत्तात्रय बळवंत राणे, मुंबई
(३) **जॉइंट सेक्रेटरी:**—श्री. रामचंद्र दादा कोते पाटील, शिरडी
(४) **खजिनदार:**—श्री. विनायक शामराव किर्तीकर, मुंबई
(५) **जॉइंट खजिनदार:**—श्री. डॉ. के. भ. गव्हाणकर, मुंबई
(६) **सभासद:**—श्री. डॉ. भोलानाथ सुंदरराव नवलकर PH. D., मुंबई
(७) ,, ,, मधुसूदन धों. कांबळी, मुंबई
(८) ,, ,, गोविंद विनायक वाड, नाशिक
(९) ,, ,, साईप्रसाद मोरेश्वर प्रधान, मुंबई
(१०) ,, ,, त्र्यंबक हणमंता कोते पाटील, शिरडी

## सूचना

(१) श्रीसाईलीलेचें वर्ष जानेवारीपासून सुरू होतें. १९४९ सालचा हा शेवटचा अंक आहे तरी सभासदांस सर्व विनंती करितो कीं, प्रत्येकांनीं आपआपली वार्षिक वर्गणी २ रु. ४–०, (साईलीला त्रैमासिक) मॅनेजर, शिरडी संस्थान, शिरडी या पत्त्यावर पाठविणें.

(२ श्रीसाईलीला त्रैमासिकचे १९४८ व १९४९ चे जुने अंक संपादक यांजकडे मिळतील.

—संपादक

# —:आरती:—

जय देव, जय देव; जय साईनाथा । श्री सद्गुरुनाथा ।
विश्वंभर विश्वेशा तारक तूं जगता ॥ धृ ॥

ब्रह्मांडाचा नायक देवा तूं कळले ।
प्रत्यय निजभक्तांतें अद्भुत दावियले ।
ब्रह्मा, विष्णू, शंकर, गणपती तूं त्राता ।
भजतां तव पदकमलां हरती भवचिंता ॥ १ ॥

हरुनी दारिद्र्यातें रंका रक्षियलें ।
रोगग्रस्तां तुझिया उदिनें तारियलें ।
वांझेसी तोषविलें देउनिया पुत्रा ।
जो जे वांछिल त्यांचा तूं असती दाता ॥ २ ॥

ज्ञानरवी तूं दिधले ज्ञाना, अज्ञाना ।
सन्मार्गी लावुनिया उद्धरिले त्यांना ।
ऐशी तूं सकलांची ममताळू माता ।
रोमांचित तनु होई गुणमहिमा गातां ॥ ३ ॥

यमपाशा तोडुनि तूं भक्तां सोडविले ।
आयुर्बल देऊनि त्यां, सकलां तोषविले ।
ऐसे सामर्थ्याचे प्रताप तव गातां ।
शिणली मति मम आलो शरण तुला ॥ ४ ॥

"मद्वचनी विश्वासुनि जे सेवा
त्यांची चिंता लागे रात्रंदिन म
ऐसे दृढ आश्वासन दिधलेसी
करुणेचा सागर तूं अ

समतेची, योगाची मूर्ति श्रीसाई ।
ऋद्धी सिद्धी घेती लोळण तव पाई ।
अंतरसाक्षी तुजला सर्वांची वार्ता ।
अगम्य तुज ना कांहीं ऐसा तूं ज्ञाता ॥ ६ ॥

लाभे फल, करिता तव नवस समाधीला ।
दाखविसी अद्यापि निज दासां लीला ।
चुकतां, पथ दर्शविसी देउनि दृष्टांता ।
हीना दीनांचा तूं स्वामी हितकर्ता ॥ ७ ॥

जन्मोजन्मीं मजला घडुं दे श्रीसेवा ।
आशीर्वचनाचा तव लाभो मज मेवा ।
घालुनिया लोटांगण याचितसे नाथा ।
पापात्मा मी यास्तव लोटुं नका परता ।

आरती रचना
ता. २–४–१९४७ पुणें

आरती रचणार :—
**रामचंद्र गोविंद जोशी,**
नरसोबाचें देऊळ, ४०९ सदाशिव
पुणें, शहर

# श्री. साईबाबा शिरडी संस्थानांत
## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र [ मराठी ] ... ... | ७–०–० |
| २ | सच्चरित [ इंग्रजी ] ... ... | ४–०–० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी ... | ०–२–० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] ... | ०–८–० |
| ५ | सगुणोपासना .... .... ... | ०–३–० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [ इंग्रजी ] .... ... | १–४–० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर**
श्री. वि. आ. वैद्य, चाचडची चाळ, वरसावा रोड, अंधेरी, **मुंबई.**

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :– **डॉ. के. भ. गव्हाणकर** यांनीं, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक :– **के. एन. साथळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, न्यूडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, मुंबई ४.